रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक २६१
www.ramprahar.com

बुधवार, ९ एप्रिल २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

कर्जतमध्ये माती तस्करीवर मध्यरात्री केली कारवाई/२
नवी मुंबईत माझी वसुंधरा उपक्रमाला 'खत-पाणी'/६
सुधागड कबड्डी प्रीमिअर लीग रंगली/८

## सुधारित वक्फ कायदा देशभरात झाला लागू




**नवी दिल्ली :** गेल्या आठवड्यात संसदेच्या दोन्ही सभागृहात संमत झालेले वक्फ सुधारणा विधेयक कायद्यात रूपांतरीत झाले असून मंगळवार (दि. ८)पासून संपूर्ण देशभरात तो लागू झाल्याचे केंद्र सरकारकडून सांगण्यात आले आहे. अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालयाने सुधारित वक्फ कायदा लागू केल्याची अधिसूचना जारी केली आहे. या कायद्याला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सुनावणी होण्यापूर्वी केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल केले आहे. यामध्ये आमची बाजू ऐकल्याशिवाय कोणताही आदेश दिला जाऊ नये, असे केंद्र सरकारने म्हटले आहे. लोकसभा आणि राज्यसभेत मध्यरात्रीनंतर वक्फ सुधारणा विधेयकावर मतदान घेण्यात आले होते. ३ एप्रिलला लोकसभा आणि ४ एप्रिलला राज्यसभेत हे विधेयक पास करण्यात आले होते. यानंतर लगेचच ५ एप्रिलला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी यावर स्वाक्षरी केली होती.

### आदिवासींच्या घरावरील कारवाईला आमदार प्रशांत ठाकूर यांचा प्रखर विरोध

# सिडकोला थेट आत्मदहनाचा इशारा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आदिवासींच्या घरासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी मंगळवारी (दि. ८) रखरखत्या उन्हात ठिय्या आंदोलन करीत या बांधवांच्या घरावर कारवाई कराल, तर मी स्वतःला या ठिकाणी पेटवून घेईन, अशा शब्दांत आक्रमक भूमिका घेत थेट आत्मदहनाचा इशारा सिडकोला दिला. त्यामुळे सिडकोने एक पाऊल मागे येत पनवेल, उरणमधील सिडको परिक्षेत्रातील आदिवासींच्या घरे, वस्त्यांच्या बाबतीत धोरणात्मक निर्णय घेणार असल्याचे आश्वासन सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी दिले.

याचबरोबर जोपर्यंत आदिवासींच्या घरांबाबत ठोस आणि सकारात्मक निर्णय होत नाही तोपर्यंत कोणतीही कार्यवाही करायची नाही, अशी रोखठोक भूमिका आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी मांडली असता त्याला सिडकोकडून सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला. त्यामुळे कारवाईसाठी आलेल्या सिडकोच्या पथकाला रिकाम्या हाती माघारी जावे लागले असून यामुळे पनवेल, उरणमधील सिडको परिक्षेत्रातील आदिवासी बांधवाना मोठा दिलासा मिळाला.

करंजाडेजवळील आणि वडघर ग्रामपंचायतीच्या हद्दीतील फणसवाडी येथील आदिवासींच्या घरावर तोडक कारवाईसाठी सिडकोचे अधिकारी, जेसीबी व तत्सम मशिनरी, अग्निशमन दल, पोलिसांचा फौजफाटा मोठ्या प्रमाणात आल्याचे समजताच आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्या ठिकाणी धाव घेत आदिवासी बांधवांना धीर दिला. उन्हाच्या कहरात ते जमिनीवर ठिय्या मांडून बसले. जोपर्यंत आदिवासी बांधवांच्या घरासंदर्भात पुनर्वसनाची योग्य कार्यवाही होत नाही तोपर्यंत हे आंदोलन सुरूच ठेवण्याचा एल्गार त्यांनी पुकारला. जशी वेळ होत होती तसा उन्हाची तीव्रता वाढत होता. सकाळी ९ वाजल्यापासून या आंदोलनाने धार धरली होती. दुपारचे साडेबारा वाजता सूर्य आग ओकत होता, मात्र आंदोलक आमदार प्रशांत ठाकूर व इतर आंदोलक जागेवरून हलले नाही. त्यांनी कारवाईला प्रखर विरोध केला.

दरम्यान, या संदर्भात सिडकोने आंदोलकांना चर्चेसाठी आमंत्रित केले. त्यानंतर आमदार प्रशांत ठाकूर यांनी आंदोलनस्थळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, आदरणीय दि.बा. पाटीलसाहेबांनी सांगितल्याप्रमाणे चर्चेची दारे कधीही बंद करायची नाही. चर्चेतून पदरात पडेल ते घेत संपूर्ण न्याय मिळेपर्यंत त्याचा पाठपुरावा करीत रहायचा आहे. **(पान २ वर..)**

### पनवेल, उरणमधील सिडको परिक्षेत्रातील आदिवासींची घरे, वस्त्यांबाबत धोरणात्मक निर्णय घेणार -एमडी विजय सिंघल

बेलापूर येथील सिडकोच्या कार्यालयात आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांची सिडकोचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, सहव्यवस्थापकीय संचालक डॉ. राजा दयानिधी व गणेश देशमुख यांच्यासोबत दीर्घवेळ बैठक झाली. या वेळी सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्यासह इतर अधिकारीही उपस्थित होते. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी आदिवासी बांधवांच्या बाजूने भूमिका मांडत त्यांना न्याय मिळालाच पाहिजे, असे सूचित केले. या ठिकाणी झालेल्या सखोल चर्चेअंती सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, सहव्यवस्थापकीय संचालक डॉ. राजा दयानिधी व गणेश देशमुख यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यानुसार पनवेल व उरण तालुक्यातील सिडको परिक्षेत्रातील आदिवासी बांधवांच्या घरे, वस्त्यांबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याचे सिडकोने मान्य केले असून या संदर्भात सिडको प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या आगामी बैठकीत सकारात्मक पद्धतीने चर्चा होणार असल्याचे सिडकोकडून स्पष्ट करण्यात आले आहे तसेच त्या संदर्भातील पत्र आमदार प्रशांत ठाकूर यांना व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्या मान्यतेने देण्यात आले.

# पुढील पाच वर्षांत राज्याचा संतुलित विकास -मुख्यमंत्री

### इंडिया ग्लोबल फोरममध्ये मांडला रोडमॅप

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी विनाअडथळा सुविधा पुरविली जात आहे. राज्यातील सर्वच भागात गुंतवणूक व्हावी यासाठी इको सिस्टीम तयार केली जात आहे. त्यामुळे येत्या पाच वर्षांत राज्यातील सर्वच भागाचा संतुलित विकास झाल्याचे दिसेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.




बांद्रा कुर्ला संकुलातील जिओ वर्ड सेंटर येथे आयोजित 'इंडिया ग्लोबल फोरम नेक्स्ट २५' या कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस मंगळवारी (दि. ८) बोलत होते. या वेळी इंडिया ग्लोबल फोरमचे संस्थापक मनोज लढवा, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त संजय मुखर्जी, उद्योग विभागाचे सचिव पी. अन्बलगन आदींसह उद्योग क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी नवनवीन संधी निर्माण करीत आहोत. जागतिक पुरवठा साखळीसाठीही सुविधा उपलब्ध करीत आहोत. कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातसुद्धा महाराष्ट्र देशात आघाडीवर आहे. याशिवाय जगभरातील तसेच देशातील महत्त्वाच्या उद्योग कंपन्या महाराष्ट्रात आहेत. उद्योगांना लागणारे कुशल मनुष्यबळ निर्माण करीत असून त्यासाठी कौशल्य विद्यापीठ कार्यरत आहे. त्यामुळे राज्यात कुशल मनुष्यबळाची कमतरता भासणार नाही. हरित व स्मार्ट तंत्रज्ञानावर आधारित उद्योगांवरही भर देत आहोत.

महाराष्ट्राला तीन ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेशाचे मोठे योगदान असणार आहे. एकट्या एमएमआर क्षेत्रात १.५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था उभारण्याची क्षमता आहे. त्यामुळे या भागावर जास्त फोकस आहे. मुंबई ही 'फिनटेक कॅपिटल' असून नवी मुंबईत तिसरी मुंबई तयार करीत आहोत. या ठिकाणी एज्युसिटी, इनोव्हेशन सिटी निर्माण होत आहे. त्याचबरोबर नवी मुंबई विमानतळ लवकरच सुरू होणार असून अटल सेतूमुळे विमानतळ व परिसराशी कनेक्टिव्हिटी वाढली आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

**ग्रामीण भागावरही लक्ष**

मुंबई महानगर प्रदेशाबरोबरच राज्यातील ग्रामीण भागाच्या विकासावरही लक्ष देण्यात येत आहे. पुण्यात ऑटोमोबाईल, छत्रपती संभाजीनगरमध्ये इलेक्ट्रिक वाहन उद्योग हब होत आहे. गडचिरोली जिल्हा हा देशातील नवीन स्टील हब म्हणून उदयास येत आहे, तर विदर्भात सोलर उत्पादन क्षेत्र वाढत आहे. समृद्धी महामार्गामुळे शेतकऱ्यांना, उद्योजकांना लाभ होणार आहे. शक्तिपीठ मार्गामुळे मराठवाड्याचा फायदा होईल. शिर्डी, पुणे, नागपूर येथे विमानतळाचे काम सुरू आहे. दुष्काळमुक्तीसाठी तीन लाख कोटींचे चार नदीजोड प्रकल्प राबविण्यात येत असून विदर्भात कॅनॉलने पाणीपुरवठ्ययासाठी प्रकल्प उभारण्यात येणार असल्याचेही या वेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## निवडक

### मुद्रा योजनेमुळे अनेकांची स्वप्ने सत्यात उतरली -पंतप्रधान मोदी

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारकडून सुरू करण्यात आलेल्या पंतप्रधान मुद्रा योजनेला मंगळवारी (दि.८) दहा वर्षे पूर्ण झाली. यानिमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतातील मुद्रा लाभार्थ्यांशी संवाद साधला. या वेळी त्यांनी मुद्रा योजनेद्वारे परिवर्तन झालेल्या लोकांचे अभिनंदन केले आणि या योजनेने लोकांना सक्षम बनवले तसेच अनेक स्वप्ने प्रत्यक्षात साकारली, असे सांगितले.

### नवीन वाळू धोरणाला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (दि. ८) झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत नवीन वाळू धोरणासह विविध विकासकामासंदर्भात नऊ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. नवीन वाळू धोरणांतर्गत घरकुलांसाठी पाच ब्रास वाळू मोफत दिली जाणार आहे. याशिवाय महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा निर्मुलन व पुनर्वसन) अधिनियम-१९७१मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे झोपडपट्टी पुनर्वसनाला गती मिळेल.

## क्रिकेटपटू केदार जाधव भाजपमध्ये



**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचा माजी क्रिकेटपटू केदार जाधव याने गेल्या वर्षी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. त्यानंतर तो समालोचन करताना दिसत होता. आता त्याने राजकारणाच्या आखाड्यात उडी घेतली आहे. केदारने मंगळवारी (दि. ८) मुंबईत आयोजित एका कार्यक्रमात भाजपमध्ये प्रवेश केला. भाजप प्रदेशाध्यक्ष तथा राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत केदारने 'कमळ' हाती घेतले.

भाजपत प्रवेश केल्यानंतर केदार जाधव म्हणाला, २०१४मध्ये केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार आले, तेव्हापासून त्यांना नागरिकांकडून जे प्रेम, समर्थन मिळाले त्याच्या जोरावर त्यांनी देशाला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले आहे. गेल्या कित्येक वर्षांत कुठल्याही सरकारला जे जमले नाही ते मोदी सरकारने गेल्या १० वर्षांत करून दाखवले आहे.

पंतप्रधान मोदींनी जसा देशाचा विकास केला तसाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राचा विकास केला आहे, असे सांगून केदार पुढे म्हणाला की, मला पंतप्रधान मोदी व मुख्यमंत्री फडणवीस यांचे काम पाहून खूप प्रेरणा मिळते. त्यामुळेच मी भाजपमध्ये प्रवेश केला. माझे आता एकच ध्येय आहे, देशाच्या व महाराष्ट्राच्या विकासासाठी, प्रगतीसाठी जे काही करता येईल ते सगळे मला करायचे आहे.

## रायगडातील सरपंचपदाची आरक्षण अधिसूचना जारी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील आगामी ग्रामपंचायत निवडणुकीसाठी प्रशासनाची तयारी जवळपास पूर्ण झाली आहे. आता सर्व ८१० ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाकरिता पुढील पाच वर्षांच्या कालावधीसाठीचे आरक्षण निश्चित करून अधिसूचना राजपत्राद्वारे प्रसिद्ध झाली आहे. त्यानुसार तालुका निहाय आरक्षित सरपंचपदांची संख्या निश्चित करून जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी २०२५ ते २०३० या कालावधीसाठी तालुकानिहाय सरपंचपदाची आरक्षण अधिसूचना जारी केली आहे.

तालुकावार आरक्षित सरपंचपदांची संख्या निश्चित केल्यानंतर ग्रामपंचायतवार सरपंचपदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी संबंधित प्रांताधिकारी यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सरपंचपदाच्या आरक्षणाची सोडत काढण्यासाठी तारखादेखील निश्चित करण्यात आल्या आहेत. त्या त्या ग्रामपंचायतीमधील लोकसंख्या, मागील आरक्षण यांचा सखोल अभ्यास करून अचूक आरक्षण निश्चित करावे. सरपंच आरक्षणाची सभा संबंधित तालुक्यात घेऊन कार्यवाही पूर्ण करावी, अशा सूचना त्यांना देण्यात आल्या आहेत. **(सविस्तर वृत्त पान २ वर..)**

## अल्पवयीन नातवाने केली आजीची हत्या




**पनवेल : वार्ताहर**

आजीच्या अंगावरील सोन्याचे दागिने चोरी करण्याच्या उद्देशाने १७ वर्षीय नातवाने टॉवेलने तिचा गळा आवळून हत्या केल्याचा प्रकार पनवेल तालुक्यातील टावरवाडी येथे उघडकीस आला. या प्रकरणी पनवेल तालुका पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला असून आरोपी अल्पवयीन असल्याने त्याला बाल सुधारगृहात पाठवण्यात येणार आहे.

जानकी कान्ह्या निरगुडा (वय ७४, रा. टावरवाडी) असे मृत महिलेचे नाव आहे. त्या ३ एप्रिल रोजी सकाळी एकवीरा देवीच्या दर्शनाला जाण्यासाठी प्रेमा खंडवी हिच्या धामणी येथील घरी डोंगराळ पायवाटेने जात होत्या, मात्र तेव्हापासून त्या बेपत्ता झाल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. त्यानंतर मालडुंगे गावच्या हद्दीत डोंगराळ पायवाटेलगत असलेल्या झुडपात ७ एप्रिल रोजी जानकी निरयांचा मृतदेह आढळला. त्यांची हत्या झाल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. त्यानुसार अज्ञात आरोपीविरोधात पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिसांनी गुन्ह्याचा सखोल तपास केला असता जानकी निरगुडा यांची त्यांच्याच १७ वर्षीय नातवाने हत्या केल्याचे उघड झाले. त्याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून अधिक तपास सुरू आहे.

## रायगड कबड्डी लीगचे शानदार उद्घाटन

### एम.डी. वॉरियर्स संघाची विजयी सलामी

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन आयोजित रायगड कबड्डी लीगचे सोमवारी (दि. ७) शानदार उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन समारंभास कबड्डी क्षेत्रातील मान्यवर, अर्जुन पुरस्कार, छत्रपती शिवाजी महाराज पुरस्कार विजेते, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय खेळाडू, सर्व आठ संघांचे मालक उपस्थित होते. एम.डी. वॉरियर्स संघाने स्पर्धेत विजयी सलामी दिली.



अलिबाग समुद्र किनाऱ्यावर खेळल्या जात असलेल्या स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात कुणाचेही भाषण झाले नाही. स्पर्धेत सहभागी असलेल्या आठ संघातील खेळाडूंचे उत्कृष्ट संचालन झाले. आमदार महेंद्र दळवी, माजी आमदार पंडित पाटील, अॅड. गौतम पाटील, हर्षल पाटील, वैकुंठ पाटील, अॅड. महेश मोहिते, अॅड. अंकित बंगेरा, महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनचे खजिनदार मंगल पांडे, छत्रपती पुरस्कार विजेत्या छाया देसाई-पवार, रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मुख्य कार्यवाह चित्रा पाटील, रायगड कबड्डी लीगचे अध्यक्ष अॅड. आस्वाद पाटील, असोसिएशनचे कार्याध्यक्ष संजय पाटील, सहकार्यवाह जे.जे. पाटील, संजय ओक, दिलीप धुमाळ, हिराचंद पाटील, शरद कदम, प्रमोद मात्रे, सूर्यकांत ठाकूर, जगदीश पाटील, लक्ष्मण गावंड, यतीन घरत, नरेश म्हात्रे, ओंकार पिंगळे, सुमित माने, संदेश बेकर, रणजीत राणे, प्रफुल्ल पाटील, पांडुरंग पाटील, जनार्दन पाटील, रवींद्र म्हात्रे आदी उपस्थित होते.

स्पर्धेतील पहिला साखळी सामना ए.बी. सुपर प्लेअर व एम.डी. वॉरियर्स या दोन संघात झाला. हा सामना जिंकून एम.डी. वॉरियर्स संघाने स्पर्धेत विजयी सलामी दिली. या संघाने ए.बी. सुपर प्लेअर्स संघाचा ३२-२२ असा पराभव केला. चार दिवस रंगणाऱ्या या स्पर्धेत एकूण ३२ सामने खेळले जाणार आहेत.

## उल्हास नदीत बुडून दोघांचा मृत्यू

**कर्जत, नेरळ : प्रतिनिधी**

कर्जतजवळील खांडपे येथे असलेल्या रेडीसन ब्लू हॉटेलमधील दोन कामगारांचा उल्हास नदीत बुडून मृत्यू झाला आहे. तब्बल सहा तासांनी या दोन्ही तरुणांचे मृतदेह पाण्यातून बाहेर काढण्यात आले.

विवेक सिंग रावत आणि रूपेन सुब्बा अशी मृतांची नावे आहेत. हे दोघे खांडपे-कोंडीवडे रस्त्याला लागून असलेल्या नदीत पोहण्यासाठी गेले होते, मात्र पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने त्यांचा बुडून मृत्यू झाला. कर्जत पोलिसांनी अपघातग्रस्तांसाठी मदत करणाऱ्या टीमला पाचारण करून मृतदेह बाहेर काढले. दोन्ही मृतदेह कर्जत उपजिल्हा रुग्णालयात शवच्छेदनासाठी नेण्यात आले असून अधिक तपास सुरू आहे.

## खालापुरातील कार्यकर्त्यांचा भाजपत प्रवेश



**खालापूर : रामप्रहर वृत्त**

खालापूर येथे तालुका भाजपच्या वतीने आयोजित क्रिकेट महोत्सवात अनेक कार्यकर्त्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत सोमवारी (दि. ७) पक्षप्रवेश केला. भाजपमध्ये प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांना योग्य तो सन्मान दिला जाईल, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी सांगितले.

मंचावर भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस दीपक बेहरे, उपाध्यक्ष विठ्ठल मोरे, युवा जिल्हा उपाध्यक्ष जगदीश आगिवले, तालुकाध्यक्ष नागेश पाटील, भाजप तालुका सरचिटणीस रवींद्र पाटील, विकास रसाळ, खालापूर शहर अध्यक्ष दीपक जगताप, हरिभाऊ जाधव, आबा देशमुख, प्रवीण पाटील, बूथ अध्यक्ष हेमंत पाटील आदी होते.

या वेळी भाजपचे खालापूर तालुका प्रभारी मंडल अध्यक्ष सनी यादव व कर्जत विधानसभा युवा संयोजक प्रसाद पाटील यांच्या नेतृत्वाखाली उंबरे ग्रामपंचायतीमधील हरेश पाटील, सत्कार पाटील, ओंकार पाटील, विराज पाटील, धीरज पाटील, राजेश पाटील, गणेश पाटील, वैभव पाटील, अनिल पाटील, सुनील पाटील, अनिकेत पाटील, मंगेश पाटील, रमेश पाटील, जगदीश आखाडे, भरत आखाडे, बाळाराम आखाडे तसेच महड येथील निलेश पाटील, जयेश पाटील, अविनाश पाटील, नितेश पाटील यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. या सर्वांचे मान्यवरांकडून स्वागत करण्यात आले.

# रायगड जिल्ह्यातील विविध प्रकल्प विकासकामांना गती द्या

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे मंत्रालयातील बैठकीत निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याच्या रोहा तालुक्यातील जामगाव येथे उभारण्यात येत असलेल्या डॉ. सी. डी. देशमुख जैवविविधता, वने व उद्यान प्रकल्पात राखीव वने तसेच निसर्ग पर्यटनस्थळांच्या विकासाचा ८० कोटींचा सुधारित प्रस्ताव तात्काळ सादर करावा. वित्त विभाग प्रस्तावाची पडताळणी करुन त्वरित मान्यता देईल तसेच आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध केला जाईल. उपलब्ध ३० कोटींच्या निधीतून सध्या सुरु असलेली कामे तातडीने पूर्ण करावीत, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रायगड जिल्ह्यातील विविध विकासकामांना गती देण्यासाठी मंत्रालयात आयोजित बैठकीत दिले.



### ही आहेत विकासकामे

*१.जामगावच्या डॉ. सी. डी. देशमुख जैवविविधता, वनउद्यानाचा विकास करणार*
*२. मौजे तिसे येथील केदारजननी माता देवस्थानाच्या रोपवे निर्मितीचा प्रस्ताव*
*३. मौजे संभे गावाचे सुरक्षित स्थलांतर व पुनर्वसनाची कार्यवाही तातडीने होणार*
*४. गिरणे येथे खारभूमी संशोधन केंद्राच्या उभारणीचा मार्ग मोकळा*
*५. दिवेआगर येथे स्वदेश दर्शन योजनेतून मत्स्यालय, पर्यटक निवारा केंद्र*
*६. पद्मदुर्ग किल्याचा गडकोट किल्लेसंवर्धन योजनेत समावेश करण्याचा प्रस्ताव*
*७.मुरुड किल्ला आणि राजापूरी क्षेत्रातील अडचणी सोडवण्याबाबत चर्चा*

रायगड जिल्ह्याच्या रोहा तालुक्यातील जामगाव येथील डॉ. सी. डी. देशमुख जैवविविधता, वने व उद्यान प्रकल्पातील विकासकामे, रोहा तालुक्यातील मौजे तिसे येथील केदारजननी माता देवस्थानाच्या ठिकाणी रोपवेची उभारणी करणे, रोहा तालुक्यातील मौजे संभे या दरडप्रवण गावाचे सुरक्षिततेच्या कारणास्तव पुनर्वसन करणे, तळा तालुक्यात गिरणे येथे डॉ. बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठांतर्गत खारभूमी संशोधन केंद्राची उभारणी, श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगर येथे केंद्र शासन पुरस्कृत स्वदेश दर्शन योजनेतून मत्स्यालय, पर्यटक निवारा केंद्राची निर्मिती, मुरुड तालुक्यातील पद्मदुर्ग किल्याचा समावेश गडकोट किल्लेसंवर्धन योजनेत करण्यासह मुरुड किल्ला परिसर आणि राजापूरी ग्रामपंचायत क्षेत्रातील अडचणी सोडवण्यासंदर्भात विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीला महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, खासदार सुनील तटकरे, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीमकुमार गुप्ता, मदत व पुनर्वसन विभागाच्या अपर मुख्य सचिव डॉ. सोनीया सेठी, वित्त विभागाचे प्रधान सचिव सौरव विजय, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव डॉ. राजेश देशमुख, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, कोकणचे विभागीय आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी, रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे आदींसह शासनाच्या संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

रोहा तालुक्यातील मौजे तिसे येथील केदारजननी माता देवस्थानाच्या ठिकाणी रोपवे उभारणीसंदर्भातही बैठकीत चर्चा झाली. केंद्र शासनाच्या पर्वतमाला योजनेंतर्गत राज्यात तिसे येथील केदारजननी माता देवस्थानचा समावेश करण्यासंबंधीचा प्रस्ताव सादर करावा. हा प्रकल्प तातडीने मार्गी लावण्यासाठी वनविभागाकडून आवश्यक परवानगी मिळविण्याची कार्यवाही तातडीने सुरु करावी, असे निर्देशही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

रोहा तालुक्यातील मौजे संभे गावाला भूस्खलन आणि दरड कोसळण्याचा असलेला धोका लक्षात घेऊन सुरक्षिततेसाठी सदर गावाचे स्थलांतर आणि पुनर्वसनाची कार्यवाही युद्धपातळीवर करावी. तळा तालुक्यात गिरणे येथे डॉ. बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठांतर्गत खारभूमी संशोधन केंद्राची उभारणीबाबतही बैठकीत चर्चा करण्यात आली. विद्यापीठाची जमीन अधिग्रहीत करताना सिडकोकडून देण्यात आलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यात येईल. विद्यापीठाला शेती, शेतीसंशोधन, शेती विस्तार, खारभूमी संशोधन केंद्रासाठी आवश्यक जमीन आणि मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील. त्यासाठी लागणारा निधी सिडको आणि राज्य शासन देईल. यासंबंधीचा वस्तूनिष्ठ प्रस्ताव विद्यापीठाने सादर करावा, त्यावर राज्य शासन सकारात्मक निर्णय घेईल, असेही बैठकीत ठरले.

# पोलादपूर, महाड, माणगाव तालुका क्रीडा संकुलासंदर्भात कार्यवाही करा

## मंत्री दत्तात्रय भरणे यांची सूचना



**मुंबई, : प्रतिनिधी**

तालुका क्रीडा संकुल पोलादपूरसाठी आरक्षित जागेची पाहणी करून संकुलासाठी जागा संपादित करण्याची कार्यवाही करण्यात यावी. माणगाव, महाड येथील क्रीडा संकुलात खेळाडूंसाठी अद्ययावत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याच्या कार्यवाहीस गती देण्याचे निर्देश क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले.

पोलादपूर, महाड, माणगाव येथे तालुका क्रीडा संकुल उभारण्यासंदर्भातील कामकाजाचा आढावा मंत्री भरणे यांनी घेतला. यावेळी रोजगार हमी योजना, फलोत्पादन आणि खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले, विभागाचे उपसचिव सुनिल पांढरे, उपसंचालक नवनाथ फरताडे, जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ आदी उपस्थित होते.

मंत्री भरणे म्हणाले की, माणगाव येथील क्रीडा संकुलात खेळाडूंसाठी बहुउद्देशीय सभागृहात बॅडमिंटन कोर्टसह चेंजिंग रूम व प्रसाधनगृह, बंदिस्त प्रेक्षागृह, बॅडमिंटन कोर्ट, धावनमार्ग, विविध खेळाचे मैदान अद्ययावत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. तसेच महाड क्रीडा संकुलाची डागडुजी करण्यात यावी. अद्ययावत टर्फचे फुटबॉल, क्रिकेट मैदान व त्या परिसरातील प्रचलित असलेल्या खेळांच्या क्रीडांगणांसाठीची कामे गतीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी या वेळी दिल्या.

# कर्जत तहसीलदारांकडून लाल मातीची तस्करी रोखण्यासाठी मध्यरात्री कारवाई

**कर्जत : प्रतिनिधी**



कर्जत तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांनी कर्जत तालुक्यातून तस्करी होत असलेल्या लाल मातीचे रॅकेट उध्वस्त केले आहे. सोमवारी मध्यरात्री साडे अकरा ते चार या वेळेत लाल मातीची तस्करी करणारे हायवा ट्रक धाडी टाकून ताब्यात घेण्यात आले.

समाज माध्यमांवर कर्जत तालुक्यातील नांदगाव, खांडस आणि ओलमन भागातून असे लाल माती घेवून जाणारे ट्रक दररोज जात असल्याच्या चर्चा दिसून येत होत्या. मात्र कोणी तक्रार केली तर महसूल विभागाचे तलाठी थातुरमाथूर कारवाई करीत होते. एकदाही लाल माती घेवून जाणारा ट्रक प्रशासनाने पकडला नव्हता.

पत्रकारांनी लाल माती घेवून जाणारे ट्रक कोणत्या भागातून येतात? कुठे माती काढली जाते? स्थानिक पातळीवर जेसीबी मशीन कोण पुरवते यांची इत्यंभूत माहिती संकलित करून ही सर्व माहिती कर्जतचे तहसीलदार डॉ धनंजय जाधव यांना दिली

सोमवारी रात्री तहसीलदार ॲक्शन घेण्यासाठी कशेळेकडे आपले सहकारी मंडळ अधिकारी बाबासो शेटे, तलाठी निलेश पवार, दत्ता ठोकळ यांच्या सोबत ग्रुप करून लाल मातीची तस्करी होत असलेल्या भागात सर्च मोहीम सुरू केली. तहसीलदार डॉ. जाधव यांनी स्वतः कशेळे खांडस रस्त्यावर तीन हायवा गाड्या यांना लाल माती यांची वाहतूक करीत असताना पकडले.

तहसीलदार आणि पोलीस आल्याचे पाहून सात हायवा गाड्या तेथेच टाकून त्या गाड्यांचे चालक जंगलात पळून गेले.

# रायगड जिल्ह्यातील सरपंचपदासाठी तालुकानिहाय आरक्षण अधिसूचना जारी

अलिबाग : प्रतिनिधी

रायगड जिल्ह्यातील आगामी ग्रामपंचायत निवडणूकांसाठी प्रशासनाची तयारी जवळपास पूर्ण झाली आहे. आता सर्व ८१० ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाकरिता पुढील पाच वर्षांच्या कालावधीसाठीचे आरक्षण निश्चित करुन अधिसूचना राजपत्राद्वारे प्रसिध्द झाली आहे. त्यानुसार तालुकानिहाय आरक्षित सरपंचपदांची संख्या निश्चित करुन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी २०25 ते २०३० या कालावधीसाठी तालुकानिहाय सरपंच पदाची आरक्षण अधिसूचना जारी केली आहे.

जिल्ह्यातील ८१० ग्रामपंचायतीच्या सरपंच पदांसाठी अनुसूचित जाती खुला १६, महिला १७, अनुसूचित जमाती खुला ६२,महिला ६२, नागरीकांचा मागासप्रवर्ग खुला १०९, महिला ११०, सर्वसाधारण –खुला २१७, महिला २१७ असे आरक्षण राहणार आहे. **अलिबाग** – ग्रामपंचायत संख्या ६२, अनुसूचित जाती खुला ०, महिला १, अनुसूचित जमाती खुला ५,महिला ६, नागरीकांचा मागासप्रवर्ग खुला ९, महिला ८, सर्वसाधारण –खुला १७, महिला १६. **मुरुड** – ग्रामपंचायत संख्या २४, अनुसूचित जाती खुला ०, महिला १, अनुसूचित जमाती खुला ३,महिला २, नागरीकांचा मागासप्रवर्ग– खुला ३, महिला ४, सर्वसाधारण –खुला ६, महिला ५. **पेण** – ग्रामपंचायत संख्या ६४, अनुसूचित जाती – खुला १,महिला ०, अनुसूचित जमाती – खुला ७,महिला ७, नागरीकांचा मागासप्रवर्ग – खुला ८, महिला ९, सर्वसाधारण –खुला १६, महिला १६. **पनवेल** – ग्रामपंचायत संख्या ७१, अनुसूचित जाती – खुला २,महिला १, अनुसूचित जमाती – खुला ५,महिला ६, नागरीकांचा मागासप्रवर्ग – खुला ९, महिला १०, सर्वसाधारण –खुला २०, महिला १८. **उरण** – ग्रामपंचायत संख्या ३५, अनुसूचित जाती – खुला १,महिला ०, अनुसूचित जमाती – खुला २,महिला १, नागरीकांचा मागासप्रवर्ग – खुला ४, महिला ५, सर्वसाधारण –खुला ११, महिला ११. **कर्जत** – ग्रामपंचायत संख्या ५५, अनुसूचित जाती – खुला १,महिला १, अनुसूचित जमाती – खुला ८,महिला ८, नागरीकांचा मागासप्रवर्ग – खुला ८, महिला ७, सर्वसाधारण –खुला १०, महिला १२. **खालापूर** – ग्रामपंचायत संख्या ४५, अनुसूचित जाती – खुला १,महिला १, अनुसूचित जमाती – खुला ५,महिला ५, नागरीकांचा मागासप्रवर्ग –१०. **रोहा** – ग्रामपंचायत संख्या ६४, अनुसूचित जाती – खुला १,महिला २, अनुसूचित जमाती – खुला ५,महिला ५, नागरीकांचा मागासप्रवर्ग – खुला ९, महिला ८, सर्वसाधारण –खुला १७, महिला १७. **सुधागड** – ग्रामपंचायत संख्या ३३, अनुसूचित जाती – खुला ०,महिला १, अनुसूचित जमाती – खुला ५,महिला ६, नागरीकांचा मागासप्रवर्ग – खुला ४, महिला ५, सर्वसाधारण –खुला ७, महिला ५.

**माणगाव** – ग्रामपंचायत संख्या ७४, अनुसूचित जाती – खुला २,महिला २, अनुसूचित जमाती – खुला ३,महिला ४, नागरीकांचा मागासप्रवर्ग – खुला १०, महिला १०, सर्वसाधारण –खुला २२, महिला २१. **तळा** – ग्रामपंचायत संख्या २५, अनुसूचित जाती – खुला १,महिला १, अनुसूचित जमाती – खुला २,महिला २, नागरीकांचा मागासप्रवर्ग – खुला ४, महिला ३, सर्वसाधारण –खुला ५, महिला ७.

**महाड** – ग्रामपंचायत संख्या १३४, अनुसूचित जाती –खुला ३,महिला ३, अनुसूचित जमाती – खुला ५,महिला ४, नागरीकांचा मागासप्रवर्ग – खुला १८, महिला १८, सर्वसाधारण –खुला ४१, महिला ४२. **पोलादपूर** – ग्रामपंचायत संख्या ४२, अनुसूचित जाती – खुला १,महिला २, अनुसूचित जमाती – खुला २, महिला १, नागरीकांचा मागासप्रवर्ग – खुला ५, महिला ६, सर्वसाधारण – खुला १३, महिला १२. **श्रीवर्धन** – ग्रामपंचायत संख्या ४३, अनुसूचित जाती – खुला १,महिला ०, अनुसूचित जमाती – खुला ३, महिला ३, नागरीकांचा मागासप्रवर्ग – खुला ६, महिला ६, सर्वसाधारण –खुला ११, महिला १३.

म्हसळा – ग्रामपंचायत संख्या ३१, अनुसूचित जाती – खुला १,महिला १, अनुसूचित जमाती – खुला २, महिला २, नागरीकांचा मागासप्रवर्ग – खुला ६, महिला ५, सर्वसाधारण – खुला १०, महिला १२.

तालुकावार आरक्षित सरपंचपदांची संख्या निश्चित केल्यानंतर ग्रामपंचायतवार सरपंचपदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी संबंधित प्रांताधिकारी यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सरपंचपदाच्या आरक्षणाची सोडत काढण्यासाठी तारखादेखील निश्चित करण्यात आल्या आहेत. त्या–त्या ग्रामपंचायतीमधील लोकसंख्या, मागील आरक्षण यांचा सखोल अभ्यास करुन अचूक आरक्षण निश्चित करावे. सरपंच आरक्षणाची सभा संबंधित तालुक्यात घेऊन कार्यवाही पूर्ण करावी, अशा सूचना त्यांना देण्यात आल्या आहेत.

**२२ एप्रिल – अलिबाग, पेण, पनवेल, कर्जत, रोहा, माणगाव, श्रीवर्धन,**

**२३ एप्रिल – मुरूड, उरण, खालापूर, सुधागड, तळा, महाड, म्हसळा**

**२४ एप्रिल – पोलादपूर**

पान १ वरुन

## आदिवासींच्या घरावरील कारवाईला आमदार प्रशांत ठाकूर यांचा प्रखर विरोध

वडघर ग्रामपंचायतीच्या हद्दीत फणसवाडीतील ही ३२ घरे १९८०पासून आहेत. या वाडीत इंदिरा आवास अंतर्गत घरे बांधण्यात आली तसेच साडेबारा टक्केचे प्लॉट येथे टाकले होते, मात्र आदिवासीवाडी असल्याने ते रद्द करण्यात आले. मग आता विमानतळ मार्गाला आणखी एक पर्यायी रस्ता म्हणून हा घाट घातला जात आहे. आदिवासी बांधवांच्या घरांवर बुलडोझर फिरवाल तर आम्हाला ते कदापीही मान्य नाही. या घरांचे योग्य पुनर्वसन व्हावे किंवा या घरांवर कोणतीच कारवाई नको अशी आमची आग्रही मागणी आहे. न्याय मिळेपर्यंत आज, उद्या आणि पुढच्या काळातही आमचे आंदोलन या ठिकाणी सुरूच राहणार असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी अधोरेखित करून 'दिबा'साहेबांच्या तत्वानुसार चर्चेला जात आहे, पण येथून मी गेल्यानंतर या घरांवर कारवाई कराल तर स्वतः या ठिकाणी पेटून घेईन, अशी आक्रमक भूमिका घेत सिडकोला सज्जड दमवजा इशारा दिला.

पनवेल, उरणमधील आदिवासी बांधवाना कायमस्वरूपी वास्तव्यासाठी धोरण निश्चित करण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी सरकारकडे यापूर्वीच केली आहे. आता एकूणच या आंदोलन आणि बैठकीतून आदिवासी वस्त्यांच्या संरक्षणासाठी सिडकोकडून धोरणात्मक निर्णयाची तयारी करणार आहे. त्यामुळे आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्या पाठपुराव्याला मोठे यश आले. या निर्णयामागे या दोन्ही लोकप्रतिनिधींचा सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि जनतेच्या समस्या सोडवण्यावरील त्यांचा कटिबद्ध दृष्टिकोन कारणीभूत ठरला आहे. त्यामुळे हा निर्णय आदिवासी समाजाच्या हक्कांच्या संरक्षणाच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल ठरणार असून आदिवासी बांधवांच्या या समस्येबाबत राज्याचे कार्यकुशल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले.

या आंदोलनात भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगरसेविका दर्शना भोईर, युवा नेते दशरथ म्हात्रे, समीर केणी, राकेश गायकवाड, करंजाडेचे सरपंच मंगेश शेलार, उपसरपंच सागर आंग्रे, माजी सरपंच प्रदीप मुंडकर, शशिकांत केणी, दयानंद केणी, सुनील भोईर, नंदकुमार भोईर, सुरेश भोईर, प्रदीप मुंडकर, विजय केणी, मोहम्मद साठी, मनीषा गायकर, ॲड. वीरा म्हात्रे–पाटील, मंदा राऊत, सपना पाटील, समिना साठी, बिपीन गायकवाड यांच्यासह कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी आदिवासीवाडीवर जाऊन साधला संवाद

## समस्या जाणून घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना दिले निर्देश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी काही दिवसापूर्वी कर्नाळा आणि आपटा ग्रामपंचायत अंतर्गत विविध आदिवासी वाड्यांमधील ग्रामस्थांसी व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारा संवाद साधला होता. यावेळी ग्रामस्थांनी ज्या समस्या मांडल्या त्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेण्यासाठी दिनांक ७ एप्रिल रोजी कर्नाळा ग्रामपंचायत अंतर्गत बानुबाईवाडी येथे प्रत्यक्ष भेट दिली.



यावेळी सहाय्यक प्रकल्प अधिकारी तेजस्विनी गलांडे, पनवेल ग्रामीणचे अप्पर तहसीलदार जितेंद्र इंगळे, विस्तार अधिकारी संतोष ठोंबरे, मंडळ अधिकारी मनोज मोरे, प्रशासक ताटरे ,तलाठी विनय मोरे, मानसी काळे, ग्रामविकास अधिकारी भोंडकर ग्रा. प.सदस्य प्रफुल पाटील, तुळसा हापसे,विष्णू वाघमारे उपस्थित होते.

या भेटीदरम्यान पीएम जन मन योजनेअंतर्गत सुरू असलेल्या घरकुल बांधकामाची पाहणी केली यावेळी एकही कुटुंब पक्क्या घरकुलापासून वंचित राहणार नाही यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले, त्यानंतर पिण्याचे पाणी, अंतर्गत रस्ता कॉंक्रिटीकरण, अंगणवाडी इमारत, स्मशान भूमी कडे जाणारा रस्ता इ. समस्या ग्रामस्थांकडून मांडण्यात आल्या .

या समस्या लवकरच मार्गी लावल्या जातील त्याचबरोबर येथील ग्रामस्थांना रोजगाराच्या दृष्टीने देखील काय योजना राबवता येतील याविषयी देखील संबंधित अधिकाऱ्यांना आराखडा तयार करण्यास सांगितले. यावेळी शेळीपालन करत असलेल्या लाभार्थ्याचे आणि फळबाग लागवड केलेल्या आदिवासी शेतकऱ्याचे कौतुक केले.

व्हिडिओ कॉन्फरन्सपेक्षा प्रत्यक्ष ग्रामस्थांसी संवाद साधल्यामुळं मला खूप समाधान वाटले, आपण निदर्शनात आणून दिलेल्या समस्या आणि तुमची घरकुले पूर्ण झाल्यानंतर मी पुन्हा एकदा या वाडीत येणार असल्याचे जिल्हाधिकारी यांनी जाहीर केले .

## दुखवटा


### अजित निगुडकर



**कर्जत** : पळसदरी येथे राहणारे अजित पंढरीनाथ निगुडकर (५३) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ज्येष्ठ वकील राजेंद्र निगुडकर यांचे बंधू होत. अजित यांच्यावर १५ वर्षांपूर्वी अँजिओप्लास्टी शस्त्रक्रिया करण्यात आली होती. शनिवारी सकाळी झोपेतच त्यांना हृदयविकाराचा झटका आला. त्यांच्या पश्चात वडील, पत्नी, मुलगी व तीन विवाहित भाऊ असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

### जयराम बगडे

**माणगाव** : उंबर्डी गावातील व निजामपूर विभागातील सामाजिक कार्यकर्ते म्हणून ओळखले जाणारे जयराम श्रीपत बगडे यांचे शुक्रवार दि. २८ मार्च रोजी दुःखद निधन झाले.



एका सर्वसामान्य कुटुंबात जन्म घेऊन मुंबई–धारावी विभाग त्यांनी स्वतःची कर्मभूमी बनवली. धारावी मधील आपल्या विभागातील राजकीय, सामाजिक कार्य करुन गोर–गरीब जनतेसाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्यपणाला लावले ते जिते पंचक्रोशी मंडळाचे अध्यक्ष होते. आपल्या विभागातील अनेक गावकऱ्यांना सायन धारावी मध्ये आश्रय व नोकऱ्या उपलब्ध करून दिल्या त्यांचा उत्तरक्रिया विधी गुरुवार दिनांक १० एप्रिल रोजी धारावी मुंबई येथील त्यांच्या राहत्या घरी होणार आहेत.

# कोयनावेळे परिसरातील पथदिव्यांचे लोकार्पण





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोयनावेळे येथील मंदार सुनील कदम यांनी सततच्या केलेल्या पाठपुराव्यामुळे एक महिन्याचा आता संपूर्ण कोयनावेळे परिसरात सरासरी २४० पथदिवे (स्ट्रीट लाईट) लावण्यात आले आहेत. हे संपूर्ण पथदिवे कोयनावेळे गाव, नवीन वसाहत (सोसायटी) सिद्धिविनायक गरिमा, महिमा, रिद्धीमा, प्रतिमा, क्यूएन ग्रीन, निवांता, वत्सल्या, नमन प्लॅटिना, तुकाराम निवास, सिमरन मजेस्टिक, शिकारा, अविघ्न, सुवर्णा जीवन, एसएम तुलीप, आरटीओ ते वृद्धाश्रम रोड या सर्व ठिकाणी लाऊन चालू करण्यात आले आहेत.

या सर्व पथदिव्यांचे लोकार्पण राम नवमीच्या शुभदिनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. भाजप युवा मोर्चा प्रभाग क्र१चे अध्यक्ष नितेश पाटील, भाजप रत्नागिरी चिपळूणचे जिल्हा अध्यक्ष विनोद कदम, नवीन कदम, भाजप कार्यकर्ते विनेश कदम, युवा कार्यकर्ते व एम९० फिटनेसचे मालक मंदार कदम, केदारनाथ मंदिराचे अध्यक्ष रवी कदम, शशिकांत कदम, प्रमोद कदम, सुशांत कदम आदींच्या उपस्थितीत हा सोहळा केदारनाथ मंदिराजवळ झाला.

# पनवेल महापालिकेच्या इंग्रजी माध्यम शाळेत प्रवेश प्रक्रिया सुरू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकनेते दि. बा. पाटील इंग्रजी माध्यम शाळा ही पनवेल महानगरपालिका व आय टीच स्कूलच्या संयुक्त विद्यमाने चालवली जात असून, पनवेल महापालिकेच्या पहिल्या इंग्रजी माध्यम शाळेची दुसरी ते सहावी साठी मर्यादित जागांसाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे.

प्रवेशासाठी अर्ज प्रक्रिया १० एप्रिल २०२५ पासून २० एप्रिल २०२५ पर्यंत सुरू असून, रविवार आणि सार्वजनिक सुट्टी वगळता दररोज सकाळी ९ ते दुपारी ३ या वेळेत शाळेतच अर्ज स्वीकारले जात आहेत. प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रांमध्ये विद्यार्थ्याचा जन्म दाखला, रहिवासी पुरावा आणि इतर आवश्यक माहिती समाविष्ट आहे. प्रवेश पात्रता व उपलब्ध जागांच्या आधारे प्रवेश दिला जाणार आहे. २३ एप्रिल रोजी लॉटरी पध्दतीने विद्यार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. पालकांनी लवकरात लवकर शाळेशी संपर्क साधून अर्ज सादर करण्याचे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी लोकनेते दि. बा. पाटील इंग्रजी माध्यम शाळा, पनवेल महापालिका कार्यालय ७७१००८३८७७ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



### प्रवेशासाठी लागणारी कागदपत्रे

*पनवेल महापालिकेच्या हद्दीतील विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेमध्ये प्राधान्य राहणार आहे. प्रवेश प्रक्रियेसाठी बालकाचे जन्म प्रमाणपत्र, बालकाचे आधार कार्ड, पालकाचे आधार कार्ड/मतदार ओळखपत्र आवश्यक आहे. तर पालकाचे रहिवासी पुरावा म्हणुन रहिवासी दाखला/विजबील/टेलिफोन बिल/पाणीपट्टी/रेशनिंग कार्ड/वाहन चालविण्याचा परवाना/पनवेल महानगरपालिकेचा कर भरल्याची पावती/राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक/भाडे तत्वावर राहणाऱ्या पालकांच्या बाबतीत दुय्यम निबंधक कार्यालयाचा नोंदणीकृत भाडे करारनाम्याची प्रत यापैकी कोणतेही एक कागदपत्रे आवश्यक आहेत.*

## पनवेलमध्ये आज परिणीता सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्रातील प्रसिद्ध परिणीता सोशल फाऊंडेशनचा बहुचर्चीत परिणीता सन्मान सोहळा यावर्षी पनवेलमध्ये होणार आहे. यावर्षीचा हा चौथा परिणीता सन्मान असून पनवेल परिणीता या सोहळ्याचे आयोजन करत आहेत.

दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी या सोहळ्याला परिणीता कलाकार, परिणीता उद्योजिका यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आहे. यावर्षी या पुरस्कारासाठी विविध विभागातून सुमारे ३२६ अर्ज आले होते. यातून २७ परिणीतांना यावर्षीचा परिणीता सन्मान घोषित होणार आहे, अशी माहिती परिणीता सन्मान सोहळा प्रमुख प्रसाद हनुमंते यांनी दिली आहे. यावर्षीच्या परिणीता सन्मान सोहळ्यात परिणीता कलाकार, परिणीता पत्रकार, सोशल मीडिया एन्फ्लुएन्सर, परिणीता सदस्या उद्योजिका अशा एकूण २७ महिलांना परिणीता सन्मान घोषित होणार आहे. यावर्षी नामांकन प्रक्रिया टाळून थेट पुरस्कार घोषित करण्यात येणार असल्याची माहिती परिणीता संस्थेच्या संस्थापिका साक्षी सागवेकर यांनी दिली आहे.

बुधवारी (दि.९) सकाळी ११ वाजता पुरस्कारांच्या घोषणेसोबतच पुरस्कार सोहळ्याची तारिख, वार, वेळ, स्थळ देखील घोषित होणार आहे. यावर्षीच्या पुरस्कार सोहळ्यासाठी प्रेक्षकांना मोफत प्रवेश दिला जाणार आहे. प्रेक्षक संख्या मर्यादित ठेवण्यात आली आहे. ज्यांना या परिणीता पुरस्कार सोहळ्याला उपस्थित राहायचे आहे त्यांनी परिणीता सन्मान आयोजन संपर्क क्रमांक ८४६८८०३३०३ यावर आपलं नाव आणि सोबत येणाऱ्यांची संख्या व्हॉट्सअॅप करावी, असे आवाहन सोहळा प्रमुख प्रसाद हनुमंते यांनी केलं आहे. ज्या कलाकार, उद्योजिकांना यावर्षीचा परिणीता सन्मान घोषित होणार आहे त्या सर्व परिणीतांचे परिणीता सोशल फाऊंडेशनच्यावतीने अभिनंदन करण्यात आले आहे.

## बस आगारात चेन चोरली

**पनवेल** : पनवेल बस आगारात एका प्रवाशाच्या गळ्यातील ७० हजार रुपये किंमतीची सोन्याची घाटी चेन अज्ञात चोरट्याने काढल्याची घटना घडली आहे.

वसंत पाटील हे पनवेल बस डेपो येथून पनवेल-पेण बसमध्ये बसत असताना कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांच्या गळ्यातील सोन्याची घाटी चेन काढून चोरुन नेली आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## मोटरसायकलची चोरी

**पनवेल** : पनवेल रेल्वे स्टेशन समोरील रोडवर उभी करून ठेवलेली दुचाकी अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना घडली आहे. प्रफुल्ल महामंकर यांनी त्यांची २५ हजार रुपये किंमतीची होंडा हॉर्नेट कंपनीची मोटरसायकल वरील ठिकाणी उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याने याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## फडके विद्यालयात भटक्या कुत्र्यांविषयी जनजागृतीसाठी मार्गदर्शन शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल येथील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी संचलित आ. वा. ब. फडके विद्यालय, प्राथमिक विभाग (इंग्रजी माध्यम) यांच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये भटक्या कुत्र्यांविषयी जागरूकता निर्माण व्हावी या उद्देशाने मार्गदर्शनपर शिबिराचे आयोजन मंगळवारी (दि.८) करण्यात आले. या शिबिरात प्रमुख मार्गदर्शक म्हणून अर्चना कुलकर्णी, अर्चिता कुलकर्णी, सुमेध गाडगीळ आणि चार्वी चौबळ यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना उपयुक्त माहिती दिली.



या शिबिरात भटक्या कुत्र्यांची सुरक्षितता, त्यांची काळजी कशी घ्यावी, विद्यार्थ्यांनी स्वतःची सुरक्षा कशी करावी, तसेच प्राणी आरोग्यविषयक प्रश्नांची उत्तरे यावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. 'मुक्या प्राण्यांबद्दल आपुलकी, आदर आणि सहानुभूती कशी निर्माण करावी?' या विषयावरही प्रेरणादायी चर्चा झाली. विद्यार्थ्यांनीही अत्यंत उत्साहाने सहभाग घेत आपल्या मनातील प्रश्न मांडून शंका दूर केल्या. शिबिराच्या शेवटी मार्गदर्शकांनी विद्यालयाच्या उपक्रमाचे विशेष कौतुक केले आणि अशा शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या संवेदनशील उपक्रमांचे आयोजन भविष्यातही करण्यात यावे, अशी इच्छा व्यक्त केली.

या वेळी प्राथमिक विभाग इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका शितल साळुंखे तसेच त्यांच्या सहकारी शिक्षकवृंद उपस्थित होते.

## आपटा येथील रामनवमी उत्सवाची सांगता

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील रामजी देवस्थानच्या रामनवमी उत्सवाची सांगता झाली. चैत्र प्रतिपदा ३० मार्च ते ८ एप्रिल या कालावधीमध्ये हा प्रतिवार्षिक उत्सव झाला. या कालावधीत नित्यपूजा, रामजप, आरती, रामरक्षा, मंत्रपुष्प, पनमान अभिषेक, श्रीरामयज्ञ, दीपोत्सव, गायन, भजन, कीर्तन, रामजन्मोत्सव, पालखीसोहळा, महाप्रसाद इत्यादी धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम झाले.

हभप श्रीनिवास काजरेकर यांच्या ललिताच्या कीर्तनाने उत्सवाची सांगता झाली. चंद्रकांत मने यांनी संवादिनी व शार्दूल डोंगरे यांनी तबलासाथ केली. या वेळी श्रीराम प्रासादिक आपटेकर नाटक मंडळी प्रस्तुत, अक्षय खैरे लिखित व सचिन जोशी दिग्दर्शित व दोन शूर या नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला.



> **देवस्थानचा हा १४४वा उत्सव असून मोठ्या उत्साहात व थाटामाटात झाला. नोकरीव्यवसायानिमित्त देशापरदेशात स्थायिक झालेले सर्व आपटेकर रहिवासी एकत्र येवून प्रतिवर्षी भक्तिभावात हा उत्सव संपन्न करतात. ललिताच्या कीर्तनामधे नाटकाच्या सादरीकरणाची परंपरा अजूनही सुरू आहे.**
>
> **-शेखर बर्वे, विश्वस्त**

## करंजा येथे महिला आणि वृद्धांसाठी आरोग्य शिबिर

**उरण : वार्ताहर**

जागतिक आरोग्य दिनानिमित्त सोमवारी (दि.७) नेव्ही वेलनेस अँड वेलफेअर असोसिएशन करंजा यांनी नेव्हल हॉस्पिटल आयएनएचएस संधानी करंजा यांच्या सहकार्याने, नेव्हल हॉस्पिटल आयएनएचएस संधानी,करंजा येथे डॉक्टर्स फॉर यू (युनिसेफ द्वारे समर्थित)च्या अंतर्गत महिला आणि वृद्धांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन केले.



या उपक्रमाचा उद्देश नौदल स्टेशन करंजा येथे नौदल समुदायातील महिला आणि वृद्ध प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेला प्रोत्साहन देणे हा होता. या शिबिरात नौदल कुटुंबातील महिला आणि पालकांचा उत्साही सहभाग होता, ज्यांनी विविध प्रकारच्या वैद्यकीय सेवांचा लाभ घेतला.

या आरोग्य शिबिरात सामान्य आरोग्य तपासणी, स्तन आणि गर्भाशयाच्या ग्रीवेच्या कर्करोगाची तपासणी, अशक्तपणा तपासणी, रक्तातील साखरेची चाचणी आणि अवलंबून असलेल्या पालकांसाठी तोंडाच्या कर्करोगाची तपासणी यांचा समावेश होता. याव्यतिरिक्त, तज्ञ डॉक्टरांनी मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.







**पनवेल : भाजपचे बूथ अध्यक्ष व प्रसिद्ध निवेदक प्रवीण मोहोकर यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, दीपक बेहेरे, चारुशीला घरत, अॅड. प्रकाश बिनेदार, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, भूपेंद्र पाटील, माजी नगरसेवक तेजस कांडपिळे, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, अनुसूचित जाती सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, किशोर सुरते, युवा मोर्चाचे तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, दिनेश खानावकर, महापालिकेचे आरोग्य निरीक्षक संजय जाधव, रजनीश जाधव, यशवंत जाधव, जिग्नेश मोहोकर, भरत मोरे यांनीही प्रवीण मोहोकर यांचे अभीष्टचिंतन करून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.**

# पनवेल कुंभारवाडा येथे रामनवमी उत्सव

## संत गोरा कुंभार मंदिरात कार्यक्रम; मान्यवरांची उपस्थिती






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संत श्रीगोरा कुंभार प्रतिष्ठान, पनवेल यांच्या वतीने रामनवमीचा भव्य महोत्सव रविवारी (दि.६) संत श्रीगोरा कुंभार मंदिरात अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. या दिवशी संपूर्ण मंदिर परिसर भक्तिरसात न्हालेला दिसून आला.

रामनवमीच्या निमित्ताने सकाळपासूनच विविध धार्मिक अनुष्ठानांचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी श्रीरामाच्या पालखीची भव्य शोभायात्रा काढण्यात आली. पनवेल शहरातून निघालेल्या या शोभायात्रेत शेकडो भक्त सहभागी झाले होते. ढोल-ताशांच्या गजरात, पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या पुरुष, महिला आणि बालकांनी नृत्य करत जय श्रीरामच्या घोषात संपूर्ण परिसर गाजवला.

शोभायात्रेमध्ये आकर्षक झांक्याही सहभागी होत्या. ढोल ताशा पथकाच्या कलाकारांनी आपल्या अप्रतिम सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. यात्रेनंतर भाविकांसाठी महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले होते, ज्याचा लाभ शेकडो नागरिकांनी घेतला.

या कार्यक्रमास पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, शिवसेनेचे प्रथमेश सोमण, महेश सावंत, तसेच प्रजापती समाज विकास मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष सी.पी. प्रजापती, रायगड जिल्हा सचिव इंदर प्रजापती आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन अमित पांडुरंग वाजेकर यांनी केले. संत श्रीगोरा कुंभार प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांमध्ये अध्यक्ष किरण कळवेकर, कार्यकारी अध्यक्ष रितेश पनवेलकर, उपाध्यक्ष प्रसाद पनवेलकर, खजिनदार नरेंद्र पनवेलकर, सचिव आशिष पनवेलकर, पंच दिलीप पनवेलकर, गंगाराम कळवेकर, दत्तात्रेय पनवेलकर, सुरेश कल्याणकर, गजानन वाजेकर, भारत कल्याणकर यांचा समावेश होता. या भव्य आणि भक्तिपूर्ण सोहळ्याने पनवेलकरांच्या मनात श्रीराम भक्तीचा नवा उत्साह संचारला.

## कंठवली आदिवासीवाडीवर राम जन्मोत्सव

**उरण : प्रतिनिधी**

वनवासी कल्याण आश्रम व विश्व हिंदू परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने उरण तालुक्यातील कंठवली येथील आदिवासी वाडीवर श्री राम नवमी जन्मोत्सव सर्वप्रथम साजरा करण्यात आला. सकाळी पूजा करून अभिषेक केला नंतर अकरा वाजता पनवेलहून आलेल्या कीर्तनकार ह.भ.प. सुनीता खरे यांचे सुश्राव्य असे कीर्तन झाले. कीर्तन सर्वांना खूप आवडलं नंतर आरती झाली. सर्वांनी दर्शन घेऊन महाप्रसादाचा लाभ घेतला आणि कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

या कार्यक्रमासाठी पनवेलहून आलेल्या कीर्तनकार सुनीता खरे, हार्मोनियम साथ देण्यासाठी आलेल्या वैशाली कुलकर्णी, समीर सोमण, सुलक्षणा टिळक, उरणहून आलेले विश्व हिंदू परिषदेचे कार्यकर्ते प्रशांत पुगावकर, श्रीकांत कुंभार, अतुल सिंह, अक्षय सोनवलकर, अनिल साळुंखे आणि कंठवली गावातले ग्रामस्थ तसेच वनवासी कल्याण आश्रमाचे कार्यकर्ते दीपक गोरे. वामन काका म्हात्रे मीरा पाटील मयुरी जगताप योगेश जगताप हे उपस्थित होते. कंठवली वाडीवरील ग्रामस्थांनी मेहनत खूप घेतली.



## संपादकीय

# मोदींचा स्टॅलिनना टोला

रामनवमीच्या मुहुर्तावर तामिळनाडूतील अनेक प्रकल्पांचे लोकार्पण पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. पंतप्रधानांचे कार्यक्रम तामिळनाडूत असताना तामिळनाडूचे मुख्यमंत्री स्टॅलिन या कार्यक्रमांना अनुपस्थित राहिले. मुख्यमंत्री पदावरील व्यक्तीकडून अशातऱ्हेचे वर्तन अशोभनीयच म्हणावे लागेल. या दौऱ्यात पंतप्रधान मोदी यांनी सत्ताधारी द्रमुकवर जोरदार प्रहार केला.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी तामिळनाडू राज्याला भेट दिली. यावेळी तामिळनाडूतील सुमारे ८३०० कोटी रूपयांच्या प्रकल्पांचे लोकार्पण पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात आले. परंतु तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी मात्र पंतप्रधानांच्या या कार्यक्रमांकडे पाठ फिरवली. साधे राजशिष्टाचार पाळण्याचे भानही स्टॅलिन यांना राहिले नाही. विरोधकांपैकी काही नेत्यांचा मोदीद्वेष किती टोकाचा आहे हेच यातून दिसून येते. गेले अनेक महिने मुख्यमंत्री स्टॅलिन निरनिराळ्या मुद्यांवरून केंद्र सरकार व भारतीय जनता पक्षावर सातत्याने टीका करीत आले आहेत. तामिळनाडूतील राजकारणात तमिळ भाषेचा मुद्दा हा परंपरेनेच भावनिक राहिला आहे. कुठल्याही राज्यातील जनतेचे आपल्या भाषेवर प्रेम असते, तसेच ते तामिळींचे देखील आहे व त्यात गैर काहीही नाही. परंतु या भाषाप्रेमाचा आपली राजकीय पोळी भाजण्यासाठी वापर करण्याचा प्रयत्न सत्ताधारी द्रमुकने आता चालवला आहे. मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी सध्या केंद्र सरकारवर त्रिभाषा सूत्र व नवीन शैक्षणिक धोरणावरून टीका करण्याचे धोरण अवलंबिले आहे. तमिळ भाषेबाबत आग्रही राहून हिंदीला विरोध करण्याचे राजकारण तेथे केले जाते आहे. या वादाला दक्षिण भारत विरुद्ध उत्तर भारत असा रंग देण्याचा प्रयत्नही द्रमुकची नेतेमंडळी करीत आहेत. केंद्रातील भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील सरकारने नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात त्रिभाषा सूत्राचा प्रस्ताव मांडला आहे. परंतु त्रिभाषा सूत्राच्या आडून तामिळनाडूवर हिंदी भाषा लादण्याचा प्रयत्न होतो आहे अशी आवई स्टॅलिन यांनी तेथे उठवली आहे. तामिळींना हिंदी भाषा शिकण्याची सक्ती करण्याचा केंद्रातील भाजप नेत्यांचा प्रयत्न आहे असा आरोप द्रमुकच्या नेत्यांनी गेले अनेक महिने चालविला आहे. हिंदीचा व पर्यायाने उत्तर भारताचा वरचष्मा दक्षिणेतील राज्ये खपवून घेणार नाहीत असा प्रचार करीत दक्षिणेतील इतर राज्यांनाही या राजकारणात आपल्यासोबत केंद्र सरकारच्या विरोधात उभे करण्याचा स्टॅलिन यांचा प्रयत्न आहे. हिंदीविरोधाचा मुद्दा तामिळनाडूत नवा नाही. यापूर्वीही अनेकदा तामिळींनी हिंदी शिकण्याला कडवा विरोध केला आहे. या विषयावरून तामिळनाडूत आंदोलने झाली आहेत. हा भाषिक वाद पेटवून दिला की त्याभोवती आपले राजकारण साधून घेता येते हे द्रमुकचे नेते जाणतात. आता तर तामिळनाडूत हिंदी भाषेला विरोध करण्यात चक्क काँग्रेस पक्षही सामील झाला आहे. या वादावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या तामिळनाडू दौऱ्यात प्रथमच भाष्य केले. तामिळनाडूचे मुख्यमंत्री स्टॅलिन यांच्यावर निशाणा साधताना मोदी म्हणाले, तामिळनाडूतील नेत्यांची मला पत्रे येतात. पण त्यावर कधीही तमिळ भाषेत स्वाक्षरी नसते. तमिळ भाषेचा इतका अभिमान बाळगणाऱ्या या नेत्यांनी तमिळमध्ये किमान सही तरी करायला हवी असा जोरदार टोला मोदींनी या नेत्यांना लगावला. तमिळ भाषा व तमिळी संस्कृती याविषयी केंद्र सरकारलाही प्रेम आहे व हा वारसा पुढे नेण्यासाठी केंद्र सरकार देखील प्रयत्नशील आहे अशी ग्वाहीही पंतप्रधानांनी यावेळी दिली.**

# कोकणातील पारंपरिक देव-डाळप उत्सव







कोकणची भूमी ही निसर्गसंपन्नतेसह संतांच्या, साधू-संतांच्या आणि लोकदैवतांच्या उपासनेसाठी प्रसिद्ध आहे. दरवर्षी दिवाळीनंतर, म्हणजेच नोव्हेंबर ते मार्च या कालावधीत संपूर्ण कोकणभर देवी-देवतांचे उत्सव मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहाने साजरे केले जातात. या उत्सवांमध्ये जत्रा, दहीहंडी, पालखी, गावपळण आणि देव-डाळप यांसारख्या पवित्र परंपरांचा समावेश होतो. त्यातील एक अतिशय प्राचीन आणि भक्तिपूर्ण उत्सव म्हणजे देव-डाळप, जो तळ कोकणातील मालवण तालुक्यातील मुक्काम किर्लोस येथे मोठ्या थाटामाटात संपन्न होतो.

या मंगल सोहळ्यात गावातील स्थानिक ग्रामस्थांसह शहरात वास्तव्य करणारे चाकरमानी देखील आपापल्या कुटुंबासमवेत मोठ्या श्रद्धेने सहभागी होतात. देव - डाळप उत्सवात देवाच्या खांबकाठींना सुरेख सजवले जाते. भव्य आणि भव्यदिव्य स्वरूपात वाजत-गाजत मिरवणुकीद्वारे त्या खांबकाठींना संपूर्ण गावभर फिरवले जाते. भक्तिरसात न्हालेल्या या सोहळ्यात भक्तांच्या जय जयकार घोषणांनी आसमंत दुमदुमून जातो. हा उत्सव केवळ श्रद्धेचा आणि भावनांचा संगम नसून, त्यामागे अनेक शास्त्रीय, सामाजिक आणि पर्यावरणीय कारणे दडलेली आहेत.

### उत्सवाची शृंखला आणि भक्तिभावाने नटलेली परंपरा

हा पवित्र सोहळा सात ते आठ दिवस चालतो. देव आपल्या गर्भगृहातून प्रस्थान करतात आणि संपूर्ण गावाच्या सीमेवर वसलेल्या छोट्या-मोठ्या देवस्थानांना भेट देतात. ज्या ठिकाणी काही वेळ ते विसावतात, तेथे मोठ्या श्रद्धेने ओटी भरण्याचा विधी पार पाडला जातो. देवांचे आदरातिथ्य मोठ्या भक्तिभावाने केले जाते. याप्रसंगी गावातील न्याय व्यवस्थेला सुद्धा महत्त्व दिले जाते. गावात अवसरी व्यक्तींचे न्यायनिवाडे याच सोहळ्यात केले जातात. हे धार्मिक आणि सामाजिक सौहार्दाचे अनोखे उदाहरण आहे. तसेच, यात्रेत सहभागी असलेल्या यात्रेकरूंना या मुक्कामाच्या ठिकाणी थोडा वेळ विश्रांतीसाठी संधी मिळते. चहा-पानासारखी सेवा भाविकांसाठी उपलब्ध करून दिली जाते. नंतर देव ठरलेल्या स्थानकावर विसाव्यासाठी पोहोचतात. स्थानिक ग्रामस्थ मोठ्या भक्तिभावाने त्या पवित्र भूमीची स्वच्छता करतात, तेथे रांगोळ्या काढतात, तो परिसर सजवतात. हा एक मोलाचा उद्देश या निमित्ताने पूर्णत्वास जातो.

### पारंपरिक कला आणि सांस्कृतिक महोत्सव :

देव त्या ठिकाणी एक रात्र वस्ती करतात, आणि त्या रात्री विविध पारंपरिक धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमांमध्ये भजन, कीर्तन, दशावतार नाट्यप्रयोग यांचा समावेश असतो. अशा प्रकारे कोकणातील समृद्ध पारंपरिक कलांना जपण्याचे आणि पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचे कार्यही या सोहळ्यातून साध्य होते. दुसऱ्या दिवशी सकाळी महाप्रसादाचा भव्य सोहळा संपन्न होतो. संपूर्ण गावातील भक्तगण मोठ्या श्रद्धेने प्रसादाचा लाभ घेतात आणि देव पुढील प्रवासासाठी प्रस्थान करतात.

### सामाजिक आणि पर्यावरणीय योगदान :

उत्सवाच्या निमित्ताने गावातील प्राचीन वाटा, मार्ग यांची डागडुजी आणि स्वच्छता केली जाते. गावातील कुणी जर सार्वजनिक वाट अडवून ठेवली असेल, तर ती देवाची वाट म्हणून कायमस्वरूपी खुली केली जाते. आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे हिंस्र प्राण्यांपासून संरक्षण. देव वाजत-गाजत आणि मंगलमय वातावरणात जंगलातून मार्गक्रमण करत जातात. या दिव्य सोहळ्यामुळे जंगलातील हिंस्र पशु गावाच्या हद्दीपासून दूर पळतात, त्यामुळे शेतकरी, गवळी, वाटसरू आणि गुरे-ढोरे यांना अभय मिळते.

### गावातील शांतता, ऐक्य आणि नव्या नेतृत्वाचा उदय

हा सोहळा गावकऱ्यांसाठी केवळ धार्मिक उत्सव नसून, सामाजिक ऐक्याची आणि बंधुभावाची खूण आहे. उत्सवादरम्यान गावातील तक्रारी आणि वाद मिटवले जातात. गावातील मुख्य मंडळी न्यायनिवाडा करत न्यायपूर्ण मार्ग काढतात.या सोहळ्यातून नव्या नेतृत्वाला देखील चालना मिळते. उत्सवाच्या नियोजनात सक्रिय असलेल्या तरुणांना गावातील प्रमुख मंडळींकडून प्रतिनिधित्वाची संधी मिळते. त्यामुळे भविष्यात नवे नेतृत्व उदयास येण्यास मदत होते.

### उत्सवाचा समारोप :

ईडापिडा टळून मंगलमय वातावरणाचा संचार आठ दिवस चाललेल्या या भक्तिमय, मंगलमय सोहळ्यानंतर संपूर्ण गाव नवचैतन्याने भरून जाते. गावातील ईडापिडा टळते, संकटांचा नाश होतो आणि गावात आनंद व समाधानाचे वातावरण निर्माण होते.

### शेवटचे शब्द:

देव-डाळप हा उत्सव केवळ धार्मिक विधी नसून, सामाजिक एकता, संस्कृतीचे जतन आणि पर्यावरणपूरक उद्दिष्टांचा सुंदर मिलाफ आहे. हा पवित्र सोहळा गावकऱ्यांना एकत्र आणतो, न्याय व्यवस्थेस चालना देतो, गावातील प्रश्न सोडवतो आणि आपली पारंपरिक संस्कृती पुढील पिढ्यांपर्यंत पोहचवतो.

**- विजय लाड,** मुलुंड (पूर्व)
मूळ रा. किर्लोस आंबवणेवाडी



## बदलते तंत्रज्ञान

# उन्हाळ्यात एसी राहील सुपरकूल; करा 'हे' काम




फेब्रुवारी महिना संपला असून तापमानात दररोज वाढ होत आहे. दिवसेंदिवस जसजशी उष्णता वाढेल, तसतसे एअर कंडिशनरची गरज भासू लागेल. जर तुमच्या घरात आधीच एसी असेल तर तो अचानक चालू करण्याऐवजी, आधी काही आवश्यक तयारी करा.खरं तर, जर एसी अनेक महिने बंद राहिला तर त्यात धूळ किंवा घाण जमा होऊ शकते, ज्यामुळे हवेची गुणवत्ता खराब होऊ शकते. ते आपल्या आरोग्यासाठीही हानिकारक आहे. म्हणून, उन्हाळ्यात एसी चालू करण्यापूर्वी काही खबरदारी घ्या. यामुळे एसी व्यवस्थित काम करेल आणि त्याचा तुमच्या आरोग्यावर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही.

एसी बराच वेळ बंद राहिल्यास त्यात ओलावा आणि घाण जमा होते. याचा त्याच्या कामगिरीवर परिणाम होतो. याशिवाय, जर एसी अनेक महिने बंद राहिला तर त्यात बॅक्टेरिया किंवा बुरशी वाढू शकते आणि त्यामुळे दुर्गंधी येऊ शकते. यामुळे, एसीला खोली थंड होण्यासाठी जास्त वेळ लागेल आणि वीजेचा वापर जास्त होईल, ज्याचा थेट परिणाम तुमच्या खिशावर होईल. त्यामुळे उन्हाळ्यात एसी चालवण्यापूर्वी त्याची सर्व्हिसिंग करून घेणे महत्त्वाचे आहे.

घाणीमुळे आणि देखभालीच्या अभावामुळे, कंप्रेसर ओव्हरलोड होतो ज्यामुळे तो खराब होण्याची शक्यता वाढते. वेळेवर सर्व्हिसिंग न झाल्यास एसीमध्ये गॅस गळती किंवा इतर तांत्रिक समस्या उद्भवू शकतात, ज्यामुळे नंतर दुरुस्तीचा खर्च अनेक पटींनी वाढू शकतो.

जर तुमचा एसी नीट काम करत नसेल तर काही चिन्हे आहेत जी सूचित करतात की त्याला सर्व्हिसिंगची आवश्यकता आहे.जर एसी पूर्वीसारखी थंड हवा देत नसेल. किंवा जर थंड होण्याची गती खूप कमी असेल तर फिल्टर किंवा कॉइलमध्ये घाण जमा झाली असेल. याशिवाय गॅसची कमतरता देखील असू शकते.जर एसी व्यतिरिक्त इतर कोणताही जास्त भार नसेल आणि वीज वापर अपेक्षेपेक्षा जास्त असेल तर याचा अर्थ एसी जास्त भार घेत आहे. जर एसीमधून खडखडाट किंवा क्लिकसारखे असामान्य आवाज येत असतील, तर याचा अर्थ एसीचा काही भाग सैल आहे. अशा परिस्थितीत, शक्य तितक्या लवकर सर्व्हिसिंग करणे चांगले होईल, जेणेकरून कोणतेही मोठे नुकसान टाळता येईल.

# समाजसेवक गणेश वासुदेव जोशी



## निमित्त

गणेश वासुदेव जोशी उर्फ सार्वजनिक काका हे महाराष्ट्रातील १९व्या शतकातील एक निष्ठावान सामाजिक कार्यकर्ते होते. त्यांचा जन्म ९ एप्रिल १८२८ रोजी सातारा येथे झाला. आर्थिक आव्हानांना तोंड देत असतानाही, त्यांच्या कुटुंबाने शिक्षणाच्या मूल्यावर भर दिला, ज्यामुळे त्यांच्या भविष्यातील प्रयत्नांचा पाया रचला गेला. त्यांचे इंग्रजी सातवीपर्यंतचे शिक्षण सातारा येथे झाले. नोकरीच्या निमित्ताने ते पुण्यात आले (१८४८) आणि न्यायालयात कारकून म्हणून रुजू झाले. नंतर त्यांनी वकिलीची परीक्षा दिली (१८६५) आणि पुण्यातच ते वकिली करू लागले. वकिलीबरोबरच त्यांनी सार्वजनिक कामात रस घेतला. बॉम्बे असोसिएशनच्या धर्तीवर पुण्यात २ एप्रिल १८७० रोजी 'सार्वजनिक सभे'ची स्थापना करण्यात आली. या संस्थेतर्फे त्यांनी खूप विधायक व समाजोपयोगी कामे केली, त्यामुळे त्यांना 'सार्वजनिक काका' हे टोपणनाव मिळाले. राजकारणाचे आद्यपीठ किंवा कांग्रेसची जननी म्हणता येईल अशी 'सार्वजनिक सभा' ही जनतेची गाऱ्हाणी सरकारदरबारी आणि वेशीवर टांगणारी क्रियाशील संस्था होती.

ही सभा सनदशीर मार्गाने काम करणारी एक प्रमुख राजकीय संस्था होती. तिचे मुख्य सूत्रधार व पहिले चिटणीस सार्वजनिक काका होते. इ.स. १८७० ते इ.स. १९२० या पन्नास वर्षांच्या काळात, विशेषतः इ.स. १८९६-९७ पर्यंत सार्वजनिक सभेचा राजकीय क्षेत्रावर चांगला प्रभाव होता. या संस्थेचे पालनपोषण पहिली दहा वर्ष मुख्यतः सार्वजनिक काकांनी केले. तिच्यामार्फत विविध उपक्रम करून त्यांनी लोकजागृती केली. सभेचे कार्य घटनानियमांनुसार जरी चालू होते तरी तिच्या सर्व कार्यामागे काकांची प्रेरक शक्ती होती. सभेचे राजकारण हे सनदशीर व इंग्रजांच्या मदतीनेच होणार होते. जोशी आणि रानडे यांनी मिळून आर्थिक, औद्योगिक आणि राजकीय स्वरुपांची अनेक कामे हातात घेतली आणि जनतेला जागृत व संघटित करण्याचे मौलिक काम केले. शिवाय जनतेची गार्हाणी व अडचणी सरकार दरबारी मांडण्याचे प्रयत्न या संस्थेमार्फत सार्वजनिक काकांनी केले.

सार्वजनिक काकांनी १८७२ मध्ये स्वदेशी चळवळीचा श्रीगणेशा केला. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी यांच्या कितीतरी वर्षे अगोदर त्यांनी स्वदेशीची चळवळ सुरू केली होती. १२ जानेवारी १८७२ रोजी त्यांनी खादी वापरण्याची शपथ घेतली व ती आयुष्यभर पाळली. खादीचा वापर व त्याचा जाणीवपूर्वक प्रचार व प्रसार करणारे सार्वजनिक काका हे पहिले द्रष्टे देशभक्त होते.त्यांनी 'देशी व्यापारोत्तेजक मंडळ' या संस्थेची स्थापना करून शाई, साबण, मेणबत्त्या, छत्र्या इत्यादी स्वदेशी वस्तूंचे उत्पादन करण्यास प्रोत्साहन दिले. त्यासाठी स्वत: आर्थिक झीज सोसली. जातीभेदाच्या अनिष्ट प्रथेला त्यांचा विरोध होता. त्यांनी १८७१ मध्ये पुण्यात 'स्त्री विचारवती' या नावाची एक सामाजिक संस्था स्थापन केली. वासुदेव बळवंत फडक्यांच्या खटल्यांचे वकीलपत्र घेणारे गणेश जोशी हे न्या.रानडे यांचे चांगले स्नेही होते अशा या महान सामाजिक कार्यकर्त्याचे २५ जुलै १८८० रोजी निधन झाले.

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# जेवणात तेल वापरणं बंद केल्यास काय होईल?

भारतीय खाद्यपदार्थांमध्ये तेलाचा वापर सर्वाधिक केला जातो. स्वयंपाकघरातील महत्त्वाचा भाग म्हणजे खाद्यतेल. आपल्या स्वयंपाकघरात सकाळच्या नाश्त्यापासून रात्रीच्या जेवणापर्यंत जवळपास सर्वच पदार्थ तेलाच्या मदतीने तयार केले जातात. पण जर तुम्ही दोन आठवडे तुमच्या आहारात तेलाचा समावेश केला नाही, तर त्याचा शरीरावर काय परिणाम होतो, तुम्हाला माहीत आहे का,आहारतज्ज्ञ कनिक्का मल्होत्रा सांगतात, दोन आठवड्यांसाठी तेलाचा वापर पूर्णपणे बंद केला तर पचन आणि चयापचयावर अनेक अल्पकालीन परिणाम होऊ शकतात. तेलामध्ये फॅटी ॲसिड असते, जे चरबी-विद्रव्य जीवनसत्त्वे (ए, डी, ई, के) शोषून घेतात. ते न मिळाल्याने पोषक घटकांचे शोषण बिघडू शकते, ज्यामुळे पोटाच्या हालचालींत बदल होऊन पोटफुगी किंवा बद्धकोष्ठता यांसारख्या कमतरता आणि पचनातील अस्वस्थता उद्भवू शकते.



आहारातील चरबी कमी केल्याने सुरुवातीला उष्मांक कमी होऊ शकतात, ज्यामुळे वजन कमी होण्याची शक्यता असते. तथापि, यामुळे चयापचय प्रक्रियांमध्येही व्यत्यय येऊ शकतो, ज्यामुळे भूक वाढू शकते. आहारातून पूर्ण तेल काढून टाकल्याने शरीराची चरबी-विद्रव्य जीवनसत्त्वे शोषण्याची क्षमता लक्षणीयरीत्या बिघडू शकते. आवश्यक पोषक घटकांची जैवउपलब्धता कमी होते. दृष्टी, रोगप्रतिकार शक्ती आणि हाडांच्या आरोग्यासारख्या विविध शारीरिक कार्यांवर त्याचा परिणाम होऊ शकतो. त्याव्यतिरिक्त भाज्यांमधून कॅरोटीनॉइड्ससारख्या इतर पोषक घटकांचे शोषणदेखील चरबीशिवाय कमी होऊ शकते.

खाद्यतेलाचे सेवन वर्ज्य केल्याने शरीरावर होणारे दुष्परिणाम त्वचेच्या आरोग्यात बिघाड: तेल आपल्या शरीराला आवश्यक फॅटी ॲसिड प्रदान करते, परंतु, तेलाचा वापर न केल्याने कोरडेपणा आणि जळजळ होऊ शकते.

पुरेशा ऊर्जेअभावी थकव्यासह सहनशक्तीत घट: शरीराला पुरेशी ऊर्जा न मिळाल्यास व्यक्तींना थकवा जाणवेल आणि सहनशक्ती कमी झाल्याचा अनुभव येऊ शकतो. कारण- चरबी हा घटक तृप्तीचा अनुभव देतो आणि शरीरात सातत्याने ऊर्जा कायम ठेवण्यास हातभार लावतो.

चिडचिडेपणाचा अनुभव: पोषक घटकांचे अपुरे शोषण झाल्यामुळे चिडचिडेपणाचा अनुभव येऊ शकतो.

# खोपोलीत एकीकडे मुबलक पाणी, तर दुसरीकडे तीव्र पाणीटंचाई!





**खोपोली : प्रतिनिधी**

शहरातील शिळफाटा येथील पटेलनगर, मिलठाकूरवाडी,ताककईगांव, यशवंतनगर, सुभाष नगर , हाळसह शहरातील अनेक उंचावरील भागांना अनियमित पाणी वितरण मुळे नविन वाढीव पाणी पुरवठा योजनेचा उपयोग अद्यापही होत नसल्याने या भागात नागरिकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. दूसरीकडे ठराविक भागांत गरजेपेक्षा अधिक पाणी पुरवठा सुरू असल्याने येथे हजारो लीटर पाणी वाया जात असल्याचे चित्र आहे. खोपोली शहरात पाणी वितरण व्यवस्थेत जवळपास ३० टक्के,साठवणूक व प्रक्रिया प्रणालीत १० ते १२ टक्के असे साधारण ३८ ते ४० टक्के पाणी गळती होऊन पाणी वाया जात आहे. या बाबत पाणीपुरवठा विभागाला ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे. याबाबत सोमवारी टंचाई ग्रस्त भागातील नागरिक , सामाजिक कार्यकर्ते व राजकीय कार्यकर्त्यांनी एकत्रितपणे मुख्याधिकारी डॉ पंकज पाटील यांना या समस्येकडे लक्ष देण्यासाठी लेखी निवेदन दिले आहे

साधारण ४० कोटीचा निधी खर्ची करून पूर्णत्वास आलेल्या वाढीव पाणीपुरवठा योजनेतील सर्व टप्पे एक वर्षांपूर्वी पूर्ण झाले आहेत. त्यामुळे पूर्वीच्या ७० दशलक्ष लिटर पाणी क्षमते वरून खोपोली पाणीपुरवठा क्षमता आत्ता ११० ते १२० दशलक्ष लीटर पाणी उचलण्याची,साठवणुकीची व वितरण क्षमतेची झाली आहे. असे असतांना एप्रिल महिन्यात उन्हाच्या झळा वाढत असतांना खोपोली शहरातील शीळफाटा,भानवजसहित मोठया लोकवस्तीला जेमतेम एकवेळेसच पाणीपुरवठा होत असल्याने अनेक भागांत पाणी टंचाई निर्माण झाली आहे.

.खोपोली शहरात अनेक भागांत अनियमित पाणी पुरवठा होत आहे.वाढीव पाणीपुरवठा योजनेचा उपोयोग अद्यापही शिळफाटा भागातील पटेलनगर,मिल ठाकूरवाडी,ताकईगांव, बौध्वावाडा, लौजी गावाचा मोठा हिस्सा , यशवंत नगर , भानवज हाळगांव व अनेक ऊंचावर असलेल्या रहिवाशी भागांना होत नसल्याने येथील नागरिकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे खोपोलीत ठराविक भाग पाणीदार तर अनेक भागांत मात्र तीव्र पाणी टंचाई अशी परस्पर विरोधी स्थिती निर्माण झाली आहे.

उन्हाळी तीन महिन्यात खोपोलीतील कुंपनलिका कोरड्या पडत असल्याने व नगरपालिका कडून गरजे एवढा पाणी

**पाणी शुध्दीकरण व वितरण प्रणालीत सुधारणा होण्याची गरज आहे .पाणी साठवणूक क्षमता मजबूत आहे .सर्व रहिवासी भागांत समान पाणीपुरवठा वितरित होण्याची प्रणाली मजबूत होण्याची आवश्यकता आहे.**

**डॉ. सुनील पाटील,**
**माजी नगराध्यक्ष, खोपोली**

**ज्या भागांत पाणी पुरवठा कमी दाबाने होतो त्या भागातील पाणी वितरण प्रणालीत तातडीने सुधारणा होण्यासाठी पाणीपुरवठा विभागाला सूचना दिल्या आहेत. पंपिग , शुध्दीकरण ते वितरण अशा सर्व टप्प्यात पाणी गळती कमी होण्यासाठी ही प्रयत्न सुरू आहेत .वितरण प्रणालीतील कामगार , व्हॉल्व मॅन यांना प्रसिशिक्षण देण्यात आले आहे.**

**-डॉ. पंकज पाटील,**
**मुख्याधिकारी तथा**
**प्रशासक, खोपोली नगरपालिका**

## महिलेची पाच लाख रुपयांची आर्थिक फसवणूक

**खोपोली : रामप्रहर वृत्त**

खोपोली पोलीस ठाणे हद्दीत मौजे गगनगिरी मठ खोपोली ता.खालापुर येथे महिला फिर्यादी यांना २२ ते २३ मार्च रोजी फोन करून बँक ऑफ महाराष्ट्राचे मॅनेजर बोलत असल्याचे भासवुन खोटे सांगुन, फिर्यादी यांचे बँक ऑफ महाराष्ट्रामध्ये असलेले खाते क्रमांक याची के.वाय.सी करावी लागेल असे खोटे सांगुन, फिर्यादी यांना त्यांच्या व्हॉटसअपवर खोटा ए.पी.के. अँप पाठवुन त्यामध्ये त्यांचीवैयक्तीक माहिती भरण्यास सांगुन ती माहिती फिर्यादी यांचेकडुन प्राप्त करून घेवुन, फिर्यादी यांचेबँक ऑफ महाराष्ट्राचे चे खाते क्रमांक मधील पाच लाख रुपयेरक्कम स्वत:चे फायदयाकरीता फिर्यादीचे परवानगी शिवाय लबाडीचे उद्देशाने काढुन घेवुन त्यांची आर्थिक फसवणुक केली. याबाबत खोपोली पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अभिनेते निर्माते प्रदीप गोगटे यांना पुरस्कार

**कर्जत : प्रतिनिधी**



कर्जत शहरातील अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते प्रदीप गोगटे यांचा सन्मान होणार आहे. कला क्षेत्रातील योगदानाबद्दल वर्ल्ड पार्लमेंट इंटरनॅशनल पुरस्कार जाहीर झाला आहे.

अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते प्रदिप गोगटे यांना.वर्ल्ड कॉन्स्टिटच्युशन अँड पार्लमेंट असोसिएशन या जागतिक संस्थेकडून वर्ल्ड पार्लमेंट इंटरनॅशनल अवॉर्ड २०२५ हा मानाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. २० एप्रिल रोजी या जागतिक संस्थेच्या महाराष्ट्रातील मुख्य कार्यालय श्रीरामपूर येथे भव्य सोहळ्यात प्रदान करण्यात येणार आहे.


## पनवेल महानगरपालिका
### ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

दुरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
आयुक्त कार्यालय : ०२२- २७४५२३३९ उपायुक्त कार्यालय : ०२२-२७४५५७५१
ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट: www.panvelcorporation. com

**जाहीर सूचना**

उपआयुक्त, पनवेल महानगरपालिका, पनवेल हे खालील बाबींकरीता जाहीर दरपत्रके सिलबंद लिफाफ्यात मागवित आहे.

कामाचे नाव –माझी वसुंधरा अभियान अंतर्गत IEC Activity करणेकामी त्रयस्थ संस्था नेमणूक करणेबाबत.

नोंदणीकृत संस्थेकडून माझी वसुंधरा अभियान अंतर्गत IEC Activity करणेकामी त्रयस्थ संस्था नेमणूक करणेसाठी पनवेल महानगरपालिकेमार्फत दरपत्रक / बाजारभाव मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | बारा महिने कालावधी करिता दर (GST सह) |
|---|---|---|
| १ | माझी वसुंधरा अभियान अंतर्गत IEC Activity करणेकामी त्रयस्थ संस्था नेमणूक करणेबाबत. | |

सदरची दरपत्रके कार्यालयीन वेळेत दिनांक १६/०४/२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिका पर्यावरण विभागात सादर करावीत.

सदरची दरपत्रके ही कार्यालयीन वेळेत दिनांक १७/०४/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता उपआयुक्त, पर्यावरण पमपा यांचे दालनात उघडण्यात येतील.

१. उशिरा आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.
२. कोणतेही दरपत्रक नाकारण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

**सही/-**
**(स्वरूप खारगे)**
**उप आयुक्त (पर्यावरण)**
**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र.:-प.महा/पर्या/३९२४/ प्र.क्र. ०३/५८/२०२५
**दिनांक :- ०८/०४/२०२५**



## महाराष्ट्र शासन
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

### निविदा सूचना क्रमांक ०३ सन २०२५-२०२६

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालीलप्रमाणे **बी-१** नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा / बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | सुतारवाडी येथे ४ स्वतंत्र हॅलिपॅड तयार करणे ता रोहा जि रायगड | १३९००११५/- | १४००००/- | ११८०/- | ५ | वर्ग चार अ |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा संच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **०८/०४/२०२५** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **१५/०४/२०२५** वेळ १८.०० वाजेपर्यंत. |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | अधीक्षक अभियंता, रायगड (सा.बां.) मंडळ, कोकणभवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दि. **१६/०४/२०२५** वेळ ११.०० वाजता |

**टिप :-** परिपूर्ण निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धिपत्रके तसेच इतर काही दुरूस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/ १३९३**
**दिनांक : ०७/०४/२०२५**

**सही/**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**



## पनवेल महानगरपालिका
### ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बांधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | Bharti Vidyapeeth Regional Office. Sector-03, CBD., Belapur. Opp Konkan Bhavan. Navi Mumion-00014. | १३ ताड. ०६ सुबाभुळ, ०१ कडुलिंब, ०१ गुलमोहर, ०१ रेन ट्री व १ आपटा एकूण २३ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं. ३ सी, सेक्टर-०७, सी.बी.डी-बेलपाडा (खारघर नोड), ता. पनवेल, जि. रायगड या भुखंडाच्या आवारातील १३ ताड, ०६ सुबाभुळ, ०१ कडुलिंब, १ फुललमोहर, १ रेन ट्री ०१ आपटा अशी एकूण २३ झाडे नवीन इमारतीचे बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |
| २ | अरुणा पालवसम यादव, जेएन-३, बिल्डिंग नं.१८. फ्लॅट नं.०८, आशिर्वाद अपा. ओनर्स असो.. सेक्टर ०९, वाशी, नवी मुंबई | ०१ शेवगा, ०१ सप्तपर्णी, ०१ गुलमोहर व ०१ पिंपळ अशी एकूण ०४ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं.ई-१२४/३३ +३४, सेक्टर-१२, खारघर, ता. पनवेल, जि. रायगड या भुखंडाच्या आवारातील ०१ शेवगा, ०१ सप्तपर्णी, ०१ गुलमोहर व ०१ पिंपळ अशी एकूण ०४ झाडे नवीन इमारतीचे बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |
| ३ | कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, पनवेल महानगरपालिका | ०२ अशोका, ०२ बदाम, ०१ रामफळ व ०१ नारळ अशी एकूण ०६ झाडे पुनर्रोपण करणे. | पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती - क मधील लायन्स गार्डन्स ते तहसील ऑफीस ते HOC कॉलनी (अ.भु.क्र. ३३ ते ५२२/२, २९/३, २९/५. २९/६, २१, ५३०, ५३४, ५३६, ५३७) पर्यंत गटर बांधकाम व रस्ता बांधकामात ०२ अशोका, ०२ बदाम, ०१ रामफळ व ०१ नारळ अशी एकूण ०६ झाडे बाधित होत आहेत. |
| ४ | Kedar Buildcon Private Limited Builders & Developers, Shree Atharva, Plot No.50/6/12/13/3, Swami Nityanand Marg, Panvel | ०२ बदाम झाडे तोडणे | पनवेल महानगरपालिका हद्दीतील Final Plot No.-५०/४/C, At.-Panvel, Dist.-Raigad येथील रस्त्यावरील ०१ बदामाचे झाड झुकलेल्या अवस्थेत असून पडण्याच्या स्थितीत आहे तसेच ०१ बदामाच्या झाडामुळे वाहने. अग्निशमन वाहन / रुग्णवाहिका इमारतीत आत बाहेर करणेस अडथळा ठरत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची / पुनर्रोपण करणेकामी परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधीनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**उपायुक्त**
**(वृक्ष प्राधिकरण विभाग)**
**पनवेल महानगरपालिका**

**जा.क्र.:-पमपा/जनसंपर्क./३१२४/प्र.क्र. १४८/१४८/२०२४**
**दिनांक :- ०८/१०/२०२४**



महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब, मार्च १२, २०२५/ फाल्गुन २१, शके १९४६

## सार्वजनिक बांधकाम विभाग
**मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,**
**मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ मार्च २०२५.**

### अधिसूचना

**महाराष्ट्र महामार्ग अधिनियम.**

क्रमांक खाक्षेस-२०२५/प्र.क्र.५०/मुरुड/ रस्ते-८. ज्याअर्थी, महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा ५५) (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा करण्यात आला आहे) याच्या कलम १५ च्या पोट-कलम (२) तसेच उक्त कलमाच्या पोट-कलम (३) आणि कलम १७ याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने, शासन अधिसूचना, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रमांक खाक्षेस-२०२४/प्र.क्र. १२३/ रस्ते-८, दिनांक १३ मार्च २०२४ (यात यापुढे जिचा निर्देश उक्त अधिसूचना असा करण्यात आला आहे) द्वारे, सार्वजनिक प्रयोजन असलेल्या रेवस-रेड्डी सागरी महामार्ग । राज्य महामार्ग (विशेष) क्र.५ (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त महामार्ग असा करण्यात आला आहे) याचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन करणे यांसाठी, उक्त अधिसूचनेसोवत जोडलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेली जमीन संपादित करण्याचा उद्देश घोषित केला होता; आणि उक्त अधिसूचनेसोवत जोडलेल्या अनुसूचीमध्ये ज्यांच्या जमिनी समाविष्ट आहेत, अशा, उक्त जमिनींच्या हितसंबंधित व्यक्तींकडून, उक्त अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून एकवीस दिवसांच्या आत हरकती उप-विभागीय अधिकारी अलिवाग, जिल्हा रायगड, यांच्याकडे मागविल्या होत्या;

आणि ज्याअर्थी, उप-विभागीय अधिकारी, अलिबाग, जिल्हा रायगड, यांनी जमिनींच्या हितसंबंधित व्यक्तीकडून, त्यावाबतीत प्राप्त हरकती विचारात घेऊन, उक्त अधिनियमाच्या कलम १८ च्या पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, त्याचा अहवाल राज्य शासनास सादर केला आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, उक्त अहवाल विचारात घेऊन, या अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली जमीन उक्त महामार्गाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन करणे यासाठी आवश्यक असल्याचे ठरविले आहे.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा ५५) याच्या कलम १८ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, या अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीच्या रकाना (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या गावांच्या बाबतीत, त्या अनुसूचीच्या रकाना (३) मध्ये नमूद केलेला भूसंपादन क्रमांक किंवा गट क्रमांक असलेल्या जमिनी, त्या अनुसूचीच्या रकाना (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेले क्षेत्र हे, उक्त महामार्गाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन करणे यासाठी संपादित करण्यात येईल असे घोषित करीत आहे.

**अनुसूची**
**संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन**

तालुका : मुरुड जिल्हा : रायगड

| अ. क्र. (१) | गाव (२) | भूमापन क्रमांक / गट क्रमांक (३) | क्षेत्र (हेक्टर आर) (४) |
|---|---|---|---|
| १ | कोर्लई | ३५ पै | ०.०८०९ |
| २ | कोर्लई | ३६ पै | ०.३५०० |
| ३ | कोर्लई | ३४/१/अ | ०.११३२ |
| ४ | कोर्लई | ३४/१/ब | ०.२५५९ |
| ५ | कोर्लई | ३४/२ | ०.००९४ |

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**सही/-**
**प्रज्ञा वाळके,**
**शासनाचे उप सचिव.**

दिनांक ०९/०४/२०२५ क्र. जिमाका /राअ/जाहि/०९/२०२५-२०२६

# नवी मुंबईत माझी वसुंधरा उपक्रमाला 'खत-पाणी'

## महापालिका राबविणार रोपवाटिका सुधारणा कार्यक्रम

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महानगरपालिकेकडे स्वतः च्या १४ रोपवाटिका आहेत. या सर्वांची अतिशय दुरवस्था झाली होती, मात्र गेल्या काही दिवसांपासून 'माझी वसुंधरा उपक्रमा'अंतर्गत सर्व रोपवाटिका कात टाकत आहेत. साफसफाई, पाण्याची सोय, तसेच मोठ्या प्रमाणात रोपांची लागवड केली जात आहे. त्यामुळे रखरखीत उन्हाळ्यात रोपवाटिकेत आल्हाददायक दृश्य दिसत आहे.



नवी मुंबई महापालिकेच्या आठ नोडमध्ये चौदा रोपवाटिका आहेत, मात्र दुर्लक्ष झाल्याने जवळपास सर्व रोपवाटिका भकास अवस्थेत होत्या. जागोजागी कचरा, माजलेले गवत , पाण्याविना वाळलेली रोपे, रोपांसाठी केलेले गाळे तुटलेल्या अवस्थेत, रोपांच्या मातीचे वापराविना विस्कटलेले ढिगारे, अशी रोपवाटिकांची अवस्था होती. उद्यान विभागाचा कार्यभार काही आठवड्यांपूर्वी किसन पलांडे यांच्याकडे आल्यावर त्यांनी रोपवाटिकांना भेट देत परिस्थितीची पाहणी केली. त्यानंतर सूत्रे हलली आणि रोपवाटिका बहरू लागल्या.

दोन तीन आठवड्यांपूर्वी शंभर-सव्वाशे रोपे असणाऱ्या रोपटिकेत आता तब्बल सव्वीस हजारांपेक्षा अधिक प्रकारची रोपे आली आहेत. यात काही मागवण्यात आली आहेत तर अनेक रोपांचे पुनरुज्जीवन करण्यात यश आले आहे. रोपवाटिकेतील मोठ्या प्रमाणात फुलझाडे लावण्यात आली आहेत. झाडांची निवड करताना नवी मुंबईतील हवामानात रुजतील अशा झाडांची निवड करण्यात आली असून यात कदंब, आंबा, सीताफळ, आवळा, कांचन बदाम, बकुळ अशी विविध देशी झाडे आहेत. तर फुलझाडांमध्ये गुलाब, मोगरा, झेंडू, चमेली, जाई जुई शेवंती, आदी झाडांचा समावेश आहे.

> **माझी वसुंधरा उपक्रम अंतर्गत शहरातील सर्व रोपवाटिका सुधारणा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. त्याला पाणी, खत, उपयुक्त ठरेल अशी माती याची पूर्तता करण्यात येत आहे. त्या शिवाय देखभालीवर लक्ष ठेवण्यात येत आहे. देशी फुलझाडे, झाडे यांना प्राधान्य देत जोपासना केली जात आहे.**
> **-किसन पलांडे,**
> **उपायुक्त, उद्यान विभाग**

रोपवाटिकेमध्ये टप्प्याटप्प्याने सुधारणा केली जात आहे. वाशी सेक्टर आठ येथील अतिशय वाईट अस्वस्थेतील रोपवाटिका आता टवटवीत झाली आहे. त्याचप्रमाणे अन्य ठिकाणाच्या रोपवाटिका कात टाकणार आहेत. सध्या एकूण सव्वीस हजार रोपे असली तरी त्यात अजून मोठ्या प्रमाणात वाढ केली जाणार आहे.

# विशेष शिक्षकांसाठी राष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षण कार्यक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांग सशक्तीकरण संस्थान, प्रादेशिक केंद्र नवी मुंबई ही बौद्धिक दिव्यांगत्व क्षेत्रात प्रशिक्षण, संशोधन आणि विविध सेवांमध्ये कार्य करणारी भारत सरकार अंतर्गत एक प्रतिष्ठित संस्था आहे. संस्थेमार्फत २ एप्रिल जागतिक स्वमग्न जागरूकता दिना निमित्ताने २ व ३ एप्रिल रोजी नवी मुंबई महानगरपालिकेच्या शींल केंद्र, वाशी यांच्या सहकार्याने




नेवीगेटींग थ्रू स्पेक्ट्रम इनोवेशन इन ऑटिजम केअर रपव एज्युकेशन या विषयावर राष्ट्रीयस्तरावरील दोन दिवसीय ऑफलाईन (सी.आर.ई) प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. रवी प्रकाश सिंग, प्रभारी अधिकारी, राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांग सशक्तीकरण संस्थान, प्रादेशिक केंद्र नवी मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. देशभरातून महाराष्ट्र, गुजरात, गोवा, मध्य प्रदेश आदी राज्यांतून १०० हून अधिक विशेष शैक्षणिक क्षेत्रातील तज्ञांनी या प्रशिक्षणात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. रवी प्रकाश सिंग यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी मुख्य अतिथी म्हणून डॉ. प्रशांत मोरालवार बालरोगतज्ज्ञ, मान्यवर अतिथी म्हणून डॉ. लीना देशपांडे, बालरोगतज्ज्ञ तसेच रंधीर कुमार सहायक आयुक्त, आयकर विभाग, पनवेल, दीपक नवघरे प्राचार्य, नवी मुंबई पालिकेचे इटीसी केंद्र, वाशी उपस्थित होते. या कार्यक्रमात ओटीजम क्षेत्रातील यशस्वी कथा हे विशेष सत्र आयोजित करण्यात आला, ज्यामध्ये ऋतेन्द्र ठाकूर यांनी पियानो वादन, तर प्रियंकर गांगुली यांनी संगीतमय सादरीकरण केले.

यामध्ये डॉ. रवी प्रकाश सिंग, डॉ. लीना देशपांडे, डॉ. किरण बिंकर, डॉ. निशात इमाम, केवल शहा, सुश्री नेहा जमधाडे, सुश्री क्लेलिया पॉलोस, सुश्री आर. कविता, म्हणजे शोभा श्रीवास्तव, सुश्री आकांक्षा, सुश्री परमिता मुजुमदार आदींचा समावेश होता.

याशिवाय, रोहँबिलेशन ऑफ पर्सन विथ ऑटीजम या विषयावर विशेष पेपर सादरीकरण सत्र आयोजित करण्यात आले. या सत्राचे अध्यक्षस्थान डॉ. रवी प्रकाश सिंग व दीपक नवघरे यांनी भूषविले.

# पनवेल महापालिकेत लोकशाही दिन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सर्व सामान्य जनतेच्या तक्रारी व समस्या तत्परतेने सोडविण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात सोमवारी (दि.७) आयुक्त मंगेश चितळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये 'लोकशाही दिनाचे' आयोजन करण्यात आले.

झालेल्या लोकशाही दिनी नागरी सेवा सुविधा बाबत समस्या सोडविण्यात आल्या. या लोकशाही दिनी दोन तक्रारी प्राप्त झाल्या असून त्याचे तात्काळ निराकरण करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. मागील लोकशाही दिनी प्राप्त झालेल्या १० ही तक्रारीचे निवारण झाले असून शिल्लक तक्रारींची संख्या निरंक आहे.

या वेळी उपायुक्त सर्वश्री कैलास गावडे, डॉ.वैभव विधाते, प्रसेनजित कारलेकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, सहायक संचालक नगररचना केशव शिंदे, शहर अभियंता संजय कटेकर, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे ,लेखा अधिकारी संग्राम व्हारेकाटे, आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी,मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# सीबीडीत हेल्थ चेकअप कॅम्प

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

भारत रक्षा मंच आणि न्यूज मीडिया जर्नालिस्ट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने सीबीडी सेक्टर ८ मध्ये श्रीराम नवमीच्या पावन पर्वावर श्रीराम दर्शन आणि मोफत हेल्थ चेकअप कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते.



या उपक्रमाबद्दल बोलताना समन्वयक सुदिप घोलप म्हणाले, श्रीराम नवमी हा एक पवित्र दिवस आहे आणि या दिवशी 'श्रीराम दर्शन' आणि 'मोफत हेल्थ चेकअप कॅम्प' आयोजित करण्याचा आमचा उद्देश नागरिकांना धार्मिक तसेच आरोग्यविषयक सेवा पुरवणे हा होता. या कार्यासाठी सहकार्य करणाऱ्या भारत रक्षा मंच आणि न्यूज मीडिया जर्नालिस्ट असोसिएशनच्या सर्व सदस्यांचे मी आभार मानतो.

# सामाजिक समता सप्ताहानिमित्त कोकण विभागात विविध कार्यक्रम

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४व्या जयंतीनिमित्त सामाजिक न्याय विभागामार्फत राज्यभरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली असून पुढील ६ दिवस कोकण विभागात विविध कार्यक्रमांद्वारे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात येणार आहे. अशी माहिती सामाजिक न्याय विभागाचे प्रादेशिक उपायुक्त, मुंबई विभाग बाळासाहेब सोळंकी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

राज्यातील सर्व जिल्ह्यात सामाजिक न्याय विभागाच्या वतीने ८ ते १४ एप्रिल २०२५ या कालावधीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह कार्यक्रम राबविण्याचे निर्देश सामाजिक न्याय विभागाने दिले आहेत. यानुसार, कोकण विभागातही विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करून पत्रकार परिषदेला सुरुवात करण्यात आली. या वेळी कोकण विभागात राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची रुपरेषा कोकण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त बाळासाहेब सोळंकी यांनी सांगितली.

८ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह कार्यक्रमाचे उद्घाटन. ९ एप्रिल रोजी कोकण विभागातील सर्व शाळा महाविद्यालये, शासकीय वसतिगृहे येथे बाबासोब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, लघुनाट्य स्पर्धांचे आयोजन करणे. तसेच सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या लाभांचे प्रातिनिधीक स्वरुपात लाभार्थ्यांना वाटप करण्यात येणार आहे.

१० एप्रिल रोजी समता दूतांमार्फत ग्रामीण व शहरी भागात लघुनाट्य, पथनाट्य आदी माध्यमांतून सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या माहिती बाबत प्रबोधन करण्यात येईल. तसेच प्रत्येक जिल्हयात मार्जिन मनी योजनेंतर्गत कार्यशाळांचे आयोजन करण्यात येईल.११ एप्रिल रोजी, महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करून विविध वक्त्यांना निमंत्रित करून महात्मा फुलेंच्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्यात येणार आहे.

१२ एप्रिल रोजी संविधान जागर या विशेष कार्यक्रमांतर्गत भारतीय संविधानाविषयी सर्वसाधरण माहिती देणे तसेच संविधानाची निर्मिती, संविधान समिती, मुलभूत अधिकार आणि कर्तव्ये याविषयी माहिती देणाऱ्या व्याख्यानांचे आयोजन करणे. १३ एप्रिल रोजी, ज्येष्ठ नागरिकांसाठी जनजागृती शिबीर आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी मेळाव्याचे आयोजन करण्यात येणार आहे.

१४ एप्रिल रोजी सामाजिक न्याय विभागाच्या अधिनस्त असलेल्या कोकण विभागातील सर्व कार्यालये, शाळा, वसतिगृहे इत्यादी सर्व आस्थपनांमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधींना निमंत्रित करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात येत असून त्याठिकाणी, व्याख्याने, चर्चासत्रे आदी कार्यक्रम घेतले जाणार आहेत. त्याचबरोबर कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान मेळावा आयोजित करून बाबासाहेबांनी शेतकऱ्यांसाठी केलेल्या कार्याची माहिती देणारे व्याख्यान आयोजित करण्यात येणार आहे. याच दिवशी सर्व कोकण विभागातील जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांमार्फत ऑनलाइन जात पडताळणी प्रमाणपत्र वितरित करण्यात येणार आहेत.

कोकण विभागामध्ये आयोजित या कार्यक्रमांमध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा, असे आवाहन सामाजिक न्याय विभागाचे प्रादेशिक उपायुक्त, मुंबई विभाग बाळासाहेब सोळंकी यांनी यावेळी केले. या पत्रकार परिषदेस आणि कार्यक्रमास मोठी उपस्थिती होती.

# कोप्रोली येथे साईचरित्र पारायण

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील कोप्रोली गावात श्री गणेश मंदिर येथे ॐ साई सार्वजनिक पदयात्रा मंडळ कोप्रोलीतर्फे विविध धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

काकड आरती, साई बाबांचे मंगल स्नान, श्री साई चरित्र पारायण, हरिपाठ, साई बाबांची धूप आरती, श्री सत्य नारायण महापूजा, दर्शन सोहळा, महाप्रसाद, स्वागत समारंभ असे अनेक विविध धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रम कोप्रोली गावात मोठया उत्साहात झाले.

श्री बापूजीदेव कलामंच व अर्णवी आर्ट कोप्रोली उरण प्रस्तुत साई गीत, लोकगीत, कोळीगीतांचा मराठी नजराणा असलेले नृत्य सादर झाले.या नृत्य कला आविष्काराला नागरीकांनी, भाविक भक्तांनी भरभरून उत्तम प्रतिसाद दिला. शिर्डी पुरस्कार प्राप्त प्रसिद्ध गायक जगदीश पाटील यांनीही उत्तम आवाज आपल्या शैलीत गायन सादर केले. जगदीश पाटील यांच्या गायनाला रसिक प्रेषकांनी टाळ्या वाजवून मोठा प्रतिसाद दिला. सर्वच उपक्रमांना विविध क्षेत्रातील मान्यवरांनी, विविध सामाजिक संस्थेच्या, संघटनेच्या पदाधिकारी सदस्यांनी भेट देऊन कार्यक्रमाचे कौतुक केले.

उत्तम नियोजन, व्यवस्थापनाचे त्यांनी कौतुक केले.एकंदरीत सर्वच कार्यक्रम मोठया उत्साहात झाले. ॐ साई सार्वजनिक पदयात्रा मंडळ व साई सेवक ग्रामस्थ मंडळ कोप्रोलीने आयोजित केलेल्या या विविध धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमास श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्था, सर्व महिला बचत गट, माऊली हरिपाठ मंडळ, सर्व क्रिकेट क्लब, बापूजी देव मंडळ, अर्णवी आर्ट, थ्री व फोर व्हीलर रिक्षा चालक मालक संघटना कोप्रोली व ग्रामस्थ मंडळ कोप्रोली यांचे विशेष सहकार्य लाभले.

कार्यक्रम यशस्वी करण्यात या सर्वांचे महत्वाचे मोलाचे योगदान लाभल्याने आयोजकांनी या सर्वांचे आभार मानले. एकंदरीत दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी उरण तालुक्यातील कोप्रोली गावात श्री साई चरित्र पारायण व श्री सत्यनारायण महापूजा मोठ्या उत्साहात व उत्तम प्रतिसादात झाली.

# डी.वाय. पाटील स्टेडियमबाहेर स्वच्छता; नागरिकांकडून समाधान

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ येथील डी.वाय.पाटील स्टेडियममध्ये रविवारी संपन्न झालेल्या लिजेन्ड्स ई आय क्लासिको या सामान्याला हजारो क्रीडाप्रेमींची उपस्थिती असणार हे लक्षात घेत महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने स्टेडियम बाहेरील रस्ते व परिसर स्वच्छतेचे पूर्वनियोजन केले होते.



त्यास अनुसरून अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या नियंत्रणाखाली घनकचरा व्यवस्थापन विभागाचे परिमंडळ १ उपआयुक्त डॉ. अजय गडदे यांनी त्याठिकाणी प्रत्यक्ष उपस्थित राहून स्वच्छता कार्यावर नियंत्रण ठेवले आणि नेरूळ विभागाचे स्वच्छता अधिकारी अरुण पाटील व स्वच्छता निरीक्षक मिलिंद आंबेकर, नवनाथ ठोंबरे, भूषण सुतार यांच्यासह घनकचरा व्यवस्थापन विभागाचे सर्व पर्यवेक्षक, स्वच्छता दूत आणि कचरा वाहतूक पर्यवेक्षक, मॅनेजर व कचरा वाहतुकीचे सर्व स्वच्छता दूत यांच्या माध्यमातून डी वाय पाटील स्टेडियम बाहेरील रस्ते व परिसर स्वच्छ केला.

परिमंडळ १ उपआयुक्त सोमनाथ पोटरे तसेच नेरूळ विभागाचे सहाय्यक आयुक्त जयंत जावडेकर यांचेही याकामी योगदान लाभले. सामन्यानंतर रात्री ११ पासून पहाटे ३ वाजेपर्यंत ही विशेष साफसफाई मोहीम राबविण्यात आली. यामध्ये ४० हून अधिक स्वच्छताकर्मी सहभागी होते. या परिसरात पडलेला १.५ टन कचरा संकलित करून घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पस्थळी लगेच वाहून नेण्यात आला. यामध्ये प्लास्टिक बॉटल्स तसेच सुक्या कच-याचे प्रमाण मोठे होते. एवढा मोठा इव्हेन्ट होऊनही पहाटेच मॉर्नींग वॉकला बाहेर पडणाऱ्या नागरिकांनी परिसर स्वच्छ पाहून समाधान व्यक्त केले.

# सुवर्णा मिसाळ यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार



**नवी मुंबई : बातमीदार**

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलातील प्राथमिक मराठी विभागाच्या मुख्याध्यापिका सुवर्णा मिसाळ यांना कनक प्रतिष्ठानकडून दैनिक पुण्यनगरीचे मुख्य राजकीय संपादक पद्मभूषण देशपांडे यांच्या हस्ते डॉ. राधाकृष्णन आदर्श शिक्षिका पुरस्कार सन्मानचिन्ह,मानपत्र, शाल, पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.

कनक प्रतिष्ठान रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करत असून समाजातील पाच किर्तीमंत व्यक्तींचा सन्मान या वेळी करण्यात आला. पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्या भवन शाळेच्या स्थापनेपासून सुवर्णा मिसाळ या अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने प्रशासकीय कार्य करत आहेत. सुवर्णा मिसाळ यांच्या नेतृत्वात शाळेच्या प्राथमिक मराठी विभागाने 'मुख्यमंत्री माजी शाळा सुंदर शाळा' या शासकीय उपक्रमात ठाणे जिल्ह्यातून प्रथम येण्याचा बहूमान मिळवला आहे. शिष्यवृत्ती परीक्षा, विविध स्पर्धा, खेळ, नावीन्यपूर्ण विविध शैक्षणिक उपक्रमांतील यश तसेच अभ्यासाच्या नियोजनामुळे शाळा नेरूळ परिसरात विद्यार्थीप्रिय व नावलौकिक झाली आहे.

पुणे विद्यार्थी गृहाचे कार्याध्यक्ष राजेंद्र बोऱ्हाडे , माजी कार्याध्यक्ष प्रा. कृ. ना. शिरकांडे, कुलसचिव दिनेश मिसाळ सर्व मुख्याध्यापक शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापिका सुवर्णा मिसाळ यांचे अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# चिखले येथील आर्मी स्कूलमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील रायगड जिल्ह्यातील विजय आर्मी स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज, विखले येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रमावर आधारित ही माध्यम सेमी इंग्रजी निवासी सैनिक शाळा असून अनिवासी विद्यार्थ्यांसाठीही प्रवेशाची सुविधा उपलब्ध आहे.



इयत्ता ६वीसाठी प्रवेश पूर्णपणे सुरू झाला आहे. तसेच जशिप व जइउ प्रवर्गातील इयत्ता सातवी ते दहावीमधील काही रिक्त जागांसाठी आणि इयत्ता अकरावी विज्ञान शाखेसाठी ऑफलाइन प्रवेश नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. इयत्ता सहावी व सातवीसाठी निवडपूर्व परीक्षा १३ एप्रिल २०२५, रविवार रोजी सकाळी ९:३० वाजता शाळेच्या ठिकाणी होणार आहे.

अधिक माहितीसाठी कमांडंट / प्राचार्य - ७०८३१२२८००, उपप्राचार्य - ८३३०६८०३६६, उपशिक्षक - ७०७१०३०३१०, ८२८२१०६५७५, ८८७९११९६६६ यांच्याकडे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# राम नवमीनिमित्त विरूपाक्ष मंदिरात सांगीतिक कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री राम नवमीनिमित्त पनवेल येथील विरुपाक्ष मंदिरामध्ये राम रंगी रंगले या अभंग व नाट्यपदावर आधारीत सांगितिक कार्यक्रम संपन्न झाला. विरुपाक्ष मंदिर ट्रस्ट आणि 'सूर निरागस हो सांस्कृतिक विकास मंडळ' यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम झाला.



या कार्यक्रमात विदुषी संध्या सुर्वे यांच्या शिष्या चैत्राली देसाई यांचे गायन झाले. त्यानी विविध अभंग आणि नाट्यपदे सादर करून रसिक पनवेलकरांना मंत्रमुग्ध केले. अथर्व देव यांनी संवादिनी व आदित्य उपाध्ये यांनी तबलासाथ केली. गोवा येथील प्रसिद्ध निवेदिका नेहा उपाध्ये, यांनी अभ्यासपूर्ण निवेदनाने कार्यक्रमाची रंगत वाढवली.

या वेळी पनवेल येथील ज्येष्ठ गायक व संवादिनीवादक चंद्रकांत मने यांना पुणे येथे 'स्वरसुधाकर' हा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

# पंतप्रधान सूर्यघर योजनेची प्रभावी अंमलबजावणी

## महावितरणच्या पेण मंडळात दोन हजार घरांवर सोलर पॅनल



### ७८ हजार रुपये अनुदान

*'पंतप्रधान सूर्यघर मोफत वीज योजने'तून प्रत्येक कुटुंबाला ७८ हजार रुपये अनुदान दिले जाणार आहे. ३ किलोवॅट क्षमतेचा प्लांट उभारण्यासाठी सुमारे १.४५ लाख रुपये खर्च येणार आहे. रायगड जिल्ह्यात पंतप्रधान सूर्यघर योजना राबवली जात आहे. आतापर्यंत दोन हजार १२४ जणांनी आपल्या घरावर सोलर लावून घेतले आहे.*

**पेण : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यामध्ये पंतप्रधान सूर्यघर मोफत वीज योजना राबविली जात आहे. रायगड जिल्ह्यात महावितरण पेण मंडळात सोलर रूफटॉपअंतर्गत आतापर्यंत फक्त दोन हजार ११४ उच्चदाब व लघुदाब वीज ग्राहकांनी सोलर पॅनल बसवून वीजनिर्मिती सुरू केली आहे.

विजेच्या वाढत्या बिलातून सुटका हवी असेल तर सोलर रूफटॉप हा उत्तम पर्याय आहे. या रूफटॉपमुळे वीजबिलाच्या कटकटीतून सुटका होत असून, शून्य बिल येऊन पैशांची बचतही होत आहे. पाच हजार वीज ग्राहक यांनी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करून ते सोलर पॅनल बसवून वीजनिर्मिती करण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे आपणही या सोलर ऊर्जेचा पर्याय निवडून ग्राहकांनी आपले बिल शून्य करा, असे आवाहन अधीक्षक अभियंता राजाराम माने यांनी केले आहे.

वीज ग्राहक ऑनलाइन पद्धतीने अर्ज करून ते सोलर पॅनल बसवून वीजनिर्मिती करण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे आपणही या सोलर ऊर्जेचा पर्याय निवडून ग्राहकांनी आपले बिल शून्य करा, असे आवाहन वीज कंपनीकडून करण्यात आले आहे.

घराच्या छतावर तीन किलोवॅट क्षमतेचा सौरउर्जा निर्मिती प्रकल्प (रूफ टॉप सोलार यंत्रणा) बसविण्यासाठी केंद्र सरकारच्या 'पंतप्रधान सूर्यघर मोफत वीज योजने'तून प्रत्येक कुटुंबाला अनुदान दिले जाणार आहे. या सौरउर्जा प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या मोफत विजेने घरे उजळणार आहे, तसेच वीजबिलही शून्य होणार आहे.

'पंतप्रधान सूर्यघर मोफत वीज योजने'त केंद्र सरकारकडून घराच्या छतावर सौरउर्जा निर्मिती प्रकल्प बसविण्यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे. त्याद्वारे घराच्या छतावर सौरउर्जेचा वापर करून वीजनिर्मिती करायची व ती वीज घरी वापरून विजेची गरज पूर्ण करायची, अशी ही योजना आहे. यामध्ये गरजेपेक्षा अधिक वीजनिर्मिती झाल्यावर वीजबिल शून्य येते अर्थात वीज मोफत मिळते व त्यासोबत जास्तीची वीज महावितरणला विकून उत्पन्नही मिळते.

# डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे कार्य प्रेरणादायी –विक्रम कदम

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली तालुक्यातील अपघाताची आकडेवारी गंभीर असून अल्पवयीन मुलांनी वाहन चालवू नये यासाठी पालकांनी दक्ष राहण्याची गरज आहे, असे मत उपविभागीय पोलीस अधिकारी खालापूर विक्रम कदम यांनी व्यक्त केले.



सोमवारी डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे आयोजित रुग्णालयाकरिता वैद्यकीय उपकरण आणि पोलिसांकरता बॅरिकेट्स वाटप कार्यक्रमात अधिकारी विक्रम कदम उपस्थित होते. जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडातर्फे प्राथमिक रुग्णालय खालापूर साठी विविध वैद्यकीय उपकरण आणि महामार्गावरील सुरक्षिततेचा भाग असलेले बॅरिकेट्स वाटप कार्यक्रम महाराजा मंगल कार्यालय येथे पार पडला.

या कार्यक्रमासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, नायब तहसीलदार विकास पवार, खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार, खोपोली पोलीस निरीक्षक शितल राऊत, तालुका आरोग्य अधिकारी अनिल कुमार शहा, डॉ. सतीश जाखोटीया, मेडिकल असोसिएशनचे डॉ.नलिन शहा, महाराजा मंगल कार्यालयाचे मालक विक्रम साबळे आणि शेकडोच्या संख्येने श्री सदस्य उपस्थित होते.

मिळालेल्या वैद्यकीय उपकरणाचा वापर खालापूर तालुक्यातील गरीब आणि गरजूंसाठी करत खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्र स्मार्ट बनव असे आश्वासन तालुका आरोग्य अधिकारी अनिल शहा यांनी दिले. धर्माधिकारी प्रतिष्ठानचे कार्य अनेक वर्ष पाहत असून आज व्यासपीठावरून आपल्याशी संवाद साधण्याचे भाग्य मिळाले असेच भाग्य आपला कार्यात सहभागी होण्यासाठी मिळावे, अशी विनंती मेडिकल असोसिएशनचे डॉक्टर नलिन शहा यांनी केली. उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या माध्यमातून सदस्य राबवत असलेला अनेक उपक्रमाचे कौतुक केले. पंचवीस बॅरिकेट्स मागितले असताना प्रतिष्ठानकडून शंभर बॅरिकेट्स मिळाले असे कदम यांनी सांगितले.

रस्ता सुरक्षा अभियानासाठी प्रतिष्ठानने केलेल्या मदतीचे पोलीस विभागाकडून विक्रम कदम यांनी आभार मानले. आरोग्य विभाग आणि रायगड पोलिसातर्फे डॉ. श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानला आभार पत्र देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे स्थळ असलेले महाराजा मंगल कार्यालयसमोरील रस्ता मुंबई–पुणे महामार्ग अतिशय व्यस्त असतो. कार्यक्रमाला उपस्थित श्रीसदस्यांची वाहन योग्यस्थळी लावणे, श्रीसदस्य, महिला भगिनी यांना विना अडथळा रस्ता ओलांडून जातावेळी श्रीसदस्य स्वयंसेवक शिस्तबद्ध पद्धतीने रणरणत्या उन्हातदेखील सेवा बजावत होते.

# नागोठणे येथे भाजपचा स्थापना दिन उत्साहात

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे शहर व विभाग भारतीय जनता पक्षाच्या वतीने रविवार ६ एप्रिल रोजी भारतीय जनता पक्षाचा ४५वा स्थापनादिन शहरात प्रभात फेरी काढून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.





या वेळी दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष सोपान जांबेकर, महिला नेत्या तथा जिल्हा उपाध्यक्षा श्रेया कुंटे, रोहा तालुका सरचिटणीस एकनाथ ठाकूर, आनंद लाड, ता. क्रीडा संयोजक शेखर गोळे, शहराध्यक्ष सचिन मोदी, शिक्षण सेल ता. अध्यक्ष अशोक अहिरे, ज्येष्ठ कार्यकर्ते अनंता वाघ, सिराज पानसरे, संतोष लाड, रोहा ता. अध्यक्षा अपर्णा सुटे, शहर अध्यक्षा शीतल नांगरे, सोनाली पडवळ, सुखदा वढावकर , रऊफ कडवेकर, ॲड. गणेश जाधव, शहर उपाध्यक्ष गौतम जैन, शहर सरचिटणीस तिरत पोलसानी, राजन दुबे, जावेद दापोळकर, शेखर कोकाटे, जनार्दन चौगुले आदी पदाधिकारिंसह विभागातील भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते बहूसंख्येने उपस्थित होते.

स्थापना दिनानिमित्त तत्कालीन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. मधुकर कुंटे यांच्या निवासस्थानापासून भारत माता की जय, भारतीय जनता पक्षाचा विजय असो अशा जय घोषात नागोठणे शहरात प्रभात फेरी काढण्यात आली. ही प्रभात फेरी छत्रपती शिवाजी महाराज चौक, छत्रपती शिवाजी महाराज बाजारपेठ, खूमाचा नाका, गांधी चौक मार्गे मोदी पार्क येथील भाजपा जनसंपर्क कार्यालयात आल्यानंतर प्रभात फेरीची सांगता झाली.

या वेळी सोपान जांबेकर, श्रेया कुंटे, सचिन मोदी आदिं आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ता. सरचिटणीस आनंद लाड यांनी केले. त्यानंतर उपस्थित कार्यकर्त्यांना पक्षातील वरिष्ठ नेत्यांनी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ऑनलाईन स्क्रीनवर मार्गदर्शन करून स्थापना दिनाच्या व रामनवमीच्या शुभेच्छा दिल्या.

# 'शेतकऱ्यांनी विमा संरक्षित ई–पीक पाहणी करून घ्यावी'

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यामध्ये आंबिया बहार सन–२०२४–२५ करिता युनिव्हर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स कंपनीमार्फत आंबा व काजू फळपिकांसाठी फळपीक विमा योजना योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांनी विमा संरक्षित क्षेत्राची ई–पीक पाहणी पूर्ण करुन घ्यावी, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे.

ई-पीक पाहणी

१२ जून, २०२४ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्यात पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना राबविण्यात येत आहे. पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेच्या निकषानुसार या विमा योजनेत सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यांना ई–पीक पाहणे करणे बंधनकारक आहे. ज्या शेतकऱ्यांनी आंबिया बहार सन २०२४–२५ मध्ये फळपीक विमा योजनेत सहभाग घेतलेला आहे, परंतु फळपिकांची ई–पीक पाहणी डिजीटल क्रॉप सर्व्हे (DCS) मोबाईल ॲपद्वारे केलेली नाही त्यांनी दि.२५ एप्रिल २०२५ पर्यंत विमा संरक्षित क्षेत्राची ई–पीक पाहणी पूर्ण करुन घ्यावी. अन्यथा योजनेच्या निकषानुसार ई–पीक पाहणी नोंद नसलेले सर्व विमा अर्ज रद्द करण्यात येतील व फळपीक विम्याचा लाभा दिला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

# निडी येथे काळभैरव व भवानी मातेच्या मूर्तींचा पुनर्प्राणप्रतिष्ठापना सोहळा

**नागोठणे : बातमीदार**



रोहा तालुक्यातील नागोठणे जवळील निडी ग्रामस्थ व महिला मंडळ यांच्या सौजन्याने श्री काळभैरव महाराज व भवानी मातेच्या कृपाछत्राखाली व सदगुरु स्वामी गणेशनाथ महाराज यांच्या कृपेने आणि वै. सदगुरु हरिश्चंद्र महाराज पाटील यांच्या आशीर्वादाने श्री काळभैरव महाराज व भवानी मातेचा पुर्नप्राणप्रतिष्ठापना सोहळा ८ ते १० एप्रिलदरम्यान होणार असून पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन निडी ग्रामस्थ व महिला मंडळ, काळभैरव क्रिकेट क्लब, जय भवानी क्रिकेट क्लब, जय भवानी कब्बड्डी मंडळ यांनी केले आहे.

मंगळवार ८ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता मूर्ती स्नान व पूजा आरती, सकाळी १० वाजता ग्राम प्रदक्षिणा, सायंकाळी ५ वाजता जलाधिवास व निद्राधिवास रात्री ८ वाजता महाप्रसाद, बुधवार दि. ९ एप्रिल रोजी सकाळी ५ ते ६ काकड आरती, सकाळी ९.३० वाजता श्री गणेश पुजन, पुण्याहवाचन, नवग्रह पुजन, होम हवन, धार्मिक विधी व मूर्ती अभिषेक, दुपारी १ वाजता महाप्रसाद, सायंकाळी ५ वाजता हरिपाठ, सायंकाळी ७ वाजता कीर्तन व रात्री ९ वाजता महाप्रसाद तसेच गुरुवार दि. १० एप्रिल रोजी श्री काळभैरव महाराज व भवानी मातेच्या मूर्तीची पुर्नप्राणप्रतिष्ठापना, दुपारी १ वाजता महाप्रसाद, सायंकाळी ५ वाजता हरिपाठ, सायंकाळी ७ वाजता कीर्तन तसेच रात्री ९ वाजता महाप्रसाद आदी धार्मिक कार्यक्रम संपन्न होणार असून सतत तीन दिवस निडी गाव धार्मिक वातावरणाने नाहून निघणार असल्याची माहिती बाळाराम मढवी, मधुकर मढवी, धर्मा भोपी, वामन मढवी, नारायण मढवी, गणेश केदारी, किसन मढवी, भगवान मढवी, नथुराम भोय, कृष्णा माळी, मयूर मढवी, राजेश मढवी, विलास मढवी, दिपक मढवी, मोरेश्वर मढवी, नथुराम म्हात्रे, सिताराम माने, उमेश मढवी आदी नियोजन कमिटी कडून देण्यात आली आहे.

# श्रीरामाच्या जयजयकाराने खोपोली दुमदुमली

**खोपोली : प्रतिनिधी**

श्रीराम नवमीनिमित्त खोपोली शहरात भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. फटाक्यांची आतषबाजी व श्रीरामाच्या जयकाराने खोपोली शहर दुमदुमले. खोपोली बाजारपेठेतून हनुमान मंदिरात सालाबाद प्रमाणे यंदाही विश्व हिंदू परिषद व हिंदू संघटनांतर्फे श्रीरामाच्या पालखीचे आयोजन करण्यात आले.

या पालखी सोहळ्यात भजनी मंडळ, बँड पथक, महिलांचे लेझीम पथक व सोबतीला श्रीरामाचे जय जयकार यामुळे बाजारपेठेत भक्तिमय वातावरण पाहावयास मिळाले. लेझीम पथकातील महिलांनी हिरव्या साडी परिधान केल्या, तर पुरुष वर्गाने भगवे फेटे व पारंपारिक वेश परिधान केला होता. हनुमान मंदिर ते खालची खोपोली अग्निशामक दल व पुन्हा मुख्य बाजारपेठेतून वरच्या खोपोलीतील दक्षिण मुखी मारुती मंदिर असा. पालखीचा प्रवास सुरू झाला आणि तसा भक्तांचा ओघ वाढत गेला या पालखी सोहळा विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, विविध संघटनांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पालखी सोहळ्याचा समारोप दक्षिणमुखी हनुमान मंदिरात मंदिरात महाआरतीने झाला, यावेळी मोठ्या प्रमाणात भक्तांची उपस्थिती होती. शहराच्या विविध भागात श्री रामजन्म निमित्त मंदिरांमध्ये विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. खोपोली शहरातील श्रीराम नगर येथे श्रीराम मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी सायंकाळी दीप प्रज्वलन व पालखी सोहळा आयोजित करण्यात आला यावेळी मोठ्या प्रमाणात भक्तांनी सहभाग घेतला.



# ऋग्वेद सुकाळे 'एमबीबीएस' उत्तीर्ण

**पोलादपूर : प्रतिनिधी**

महाड येथील ऋग्वेद राहुल सुकाळे सेठ.जी. एस मेडिकल कॉलेज (केइएम) मुंबई येथून एमबीबीएस पदवी परीक्षा प्रथम श्रेणीतून उत्तीर्ण झाला आहे.




ऋग्वेद हा महाडमधील कै रामचंद्र सुकाळे (सर) ह्यांचा नातू व सुप्रसिद्ध वैद्यकीय व्यावसायिक व सुकाळे नर्सिंग होमचे संचालक, डॉ राहुल व डॉ नूतन सुकाळे ह्यांचा कनिष्ठ चिरंजीव आहे. ऋग्वेद हा महाड एमआयडीसीमधील समर्थ रामदास विद्यालयाचा माजी विद्यार्थी असून रत्नागिरीच्या गोगटे शैक्षणिक संकुलनातर्फे घेण्यात आलेल्या कोकण टैलेंट सर्च एक्झामिनेशन (केटीएस परीक्षा) ह्या स्पर्धात्मक परीक्षेमध्ये सातत्याने अग्रक्रमाने यश मिळवले होते. रोटरी स्कूल खेड येथून इयत्ता १२ वी सीबीएसई परीक्षेमध्ये पूर्ण कोकण विभागातून व नीट परीक्षांमध्ये रत्नागिरी जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळवला होता.

सेठ जी.एस.मेडिकल कॉलेज मध्ये सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये कल्चरल सेक्रेटरी तसेच वेगवेगळ्या खेळ व शैक्षणिक कार्यक्रमात त्याने सदैव सहभाग घेतला आहे. इंटर्नशिप नंतर पी. जी. नीट परीक्षा द्वारे पुढील वैद्यकीय क्षेत्रात उच्चशिक्षण घेवून महाडकर नागरिकांना निरंतर तज्ञ वैद्यकीय सेवा देण्याचा मानस आहे.

# पेण नगरपालिकेकडून १८ टन घनकचऱ्यातून सेंद्रिय खत निर्मिती





**पेण : प्रतिनिधी**

पेण नगर पालिका प्रशासनाकडून स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत स्वच्छतेतून सुका व ओल्या कचऱ्यावर कंपोस्ट करून सेंद्रीय खत निर्मितीकडे एक पाऊल पुढे टाकले आहे. पेण शहरात दररोज सुमारे १७ ते १८ टन कचरा संकलित केला जातो. हा कचरा आंबेघरजवळील क्षेपणभूमी येथे साठवण्यात येऊन नंतर खत निर्मिती केली जात आहे.

पेण नगर पालिकेच्या १० ते १२ कामगारांकडून साठवलेल्या कचऱ्यातून काच, लोखंड, प्लास्टिक, थर्माकोल अशा अविघटनशील वस्तू बाजूला काढण्यात येतात. ओल्या कचऱ्यावर कंपोस्ट करून शेतकरी, बागायतदार यांना मातीची सुपीकता तसेच पिकांची आवश्यक पोषक तत्वे वाढीसाठी उपयुक्त अशा सेंद्रिय खताची निर्मिती खतप्रकल्पातून केली जात आहे. सध्या तीन टन सेंद्रीय खत तयार करण्यात आले असल्याचे आरोग्य विभाग अधिकारी दयानंद गावंड यांनी माहिती देताना सांगितले.

# नागोठणे येथे नवचंडी याग

**नागोठणे :** येथील गवळआळीतील श्री कानिफनाथ मंदिरात मोरे दादा व गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या कृपा आशीर्वादाने गुरुवारी (दि.१०) अक्कलकोट श्री स्वामी समर्थ महाराज यांचा प्रचार व प्रसाराअंतर्गत ग्राम अभियान मांदियाळी वर्ष ७ वेचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात श्री स्वामी समर्थ साप्ताहिक सेवा केंद्र (दिंडोरी प्रणित) श्री स्वामी समर्थ सेवेकरी तसेच नागोठण्यातील श्री स्वामी समर्थ यांच्या सेवेकऱ्यांसाठी श्री नवचंडी यागाचे आयोजन केले आहे. नागोठणे परिसरातील बहुसंख्य नागरिकांनी तसेच श्री स्वामी भक्तांनी उपस्थित राहून या सेवेचा लाभ घ्यावा, अशी विनंती आयोजकांनी केली आहे.

# रोहा भाजपतर्फे यात्रेकरूंसाठी मोफत पाणी

**धाटाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील प्रसिद्ध यात्रा शिवशंभू महादेवाची यात्रा म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात ख्याती आहे. या यात्रेत पार्वती महादेवाचे लग्न सोहळ्यासाठी लाखो भावीक येत असतात अशा भाविकांसाठी व यात्रेकरू साठी रोहा तालुका भाजपाच्या वतीने दोन दिवस पाणपोईचे यशस्वीरित्या नियोजन करून भाविकांची सोय केली होती. गेली बारा वर्षे भाजपचे अमित घाग त्यांचे समाजसेवक म्हणून पाणपोईच्या माध्यमातून जनतेची सेवा करत आहेत.



भाजपच्या सेवा समर्पण या विचार सरणीवर रोहा भाजपा काम करित आहे. या पाणपोईला रोहा तालुक्यातील विविध राजकीय, सामाजिक, कला, क्रिडा, सांस्कृतिक शैक्षणिक क्षेत्रातील विविध मान्यवरांची भेट दिली तर पाणपोईचे यशस्वी नियोजन करण्यासाठी रोहा तालुका सरचिटणीस कृष्णा बामणे, जिल्हा चिटणीस नरेश कोकरे, महिला जिल्हा चिटणीस श्रद्धा घाग, युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस रोशन चाफेकर, रोहा तालुका कोषाध्यक्ष राजेश डाके, रोहा तालुका कामगार आघाडी सेल अध्यक्ष विलास डाके , सोशल मीडिया संयोजक सनील इंगावले, रोहा शहर अध्यक्ष युवा मोर्चा निलेश धुमाळ, परशुराम माने, संकेत मोरे, धिरज मोंडे, विकास बामणे, हृषीकेश माने यासह भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी अथक परिश्रम घेतले.

भाविकांना कोणताही त्रास होऊ नये व कडक उन्हाळ्यात म्हणजे उन्हाळ्यात कोणताही शिवशंकराचा भाविकाला त्रास होऊ नये भक्तांची काळजी म्हणून रोहा भाजपच्या वतीने थंडगार पाण्याची सोय केलेली होती. प्रत्येक फक्त पाणी मिळावे यासाठी अमित घाग लक्ष घालून सेवा देण्याचे काम करित होते. त्यामुळे ही पाणपोईच्या माध्यमातून सेवा यात्रेच्या निमित्ताने जरी करण्यात आली असली तरीही सेवा शिव शंकराच्या चरणी समर्पित करीत आहोत, अशी भाजपच्या वतीने प्रतिक्रिया देण्यात आली.

# मुंबईच्या मैदानात आरसीबीची सरशी

**मुंबई : प्रतिनिधी**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) ने १० वर्षांनंतर वानखेडेचे चक्रव्यूह भेदत रोमांचक विजयाची नोंद केली आहे. आरसीबीने मुंबई इंडियन्सचा त्यांच्याच घरच्या मैदानावर १२ धावांनी पराभव केला. कृणाल पांड्या, विराट कोहली आणि रजत पाटीदार आरसीबीच्या विजयाचे हिरो ठरले.

मुंबईला विजयासाठी अखेरच्या षटकात १९ धावांची गरज होती. कर्णधार रजत पाटीदारने कृणाल पंड्याला गोलंदाजी दिली. कृणालने पहिल्या दोन चेंडूवर विकेट्स घेतल्या. पहिल्या चेंडूवर सँटनर, तर दुसऱ्या चेंडूवर दीपक चहर झेलबाद झाला. तिसऱ्या चेंडूवर बोल्टने एक धाव घेतली. चौथ्या चेंडूवर नमन धीरने चौकार लगावला, तर पाचव्या चेंडूवर मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्नात नमन झेलबाद झाला. अखेरच्या चेंडूवर कृणालने एकही धाव दिली नाही आणि अशा रितीने त्याने संघाच्या विजयात मोठी भूमिका बजावली.



आरसीबीने दिलेल्या २२२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या मुंबई इंडियन्स संघाची सुरुवात पुन्हा एकदा फारशी चांगली झाली नाही. रोहित शर्मा नऊ चेंडूत दोन चौकार आणि एक षटकार लगावत १७ धावा करून बाद झाला, तर काही वेळाने रायन रिकल्टनही १७ धावा करीत पायचीत झाला. धावा काढण्यासाठी झगडत असलेला विल जॅक्स २२ धावा करून बाद झाला.

सूर्यकुमार यादव घरच्या मैदानावर २८ धावा करत बाद झाला. गेल्या सामन्यात १९व्या षटकात ज्याला रिटायर्ड आऊट केले तो तिलक वर्मा २९ चेंडूत चार चौकार आणि चार षटकारांसह ५६ धावा केल्या. संघाकडून अर्धशतक झळकावणारा तो एकमेव फलंदाज ठरला.

हार्दिक पांड्याने वादळी फलंदाजी करत विजयाच्या दिशेने आणून ठेवला. तिलक वर्मा आणि हार्दिकच्या भागीदारीने सामना मुंबईच्या बाजूने वळवला होता, पण मुंबईचा संघ पुन्हा एकदा विजयाच्या जवळ येऊन सामना जिंकू शकला नाही. हार्दिक १५ चेंडूत तीन चौकार आणि चार षटकारांसह ४२ धावा करत झेलबाद झाला. यानंतर सँटनर आठ धावा करत झेलबाद झाला, तर दीपक चहरही पहिल्याच चेंडूवर झेलबाद होत माघारी परतला.

आरसीबीच्या गोलंदाजांनी वानखेडेच्या मैदानावर शानदार गोलंदाजी करत मुंबईला विजयापासून रोखले. कृणाल पांड्याने सर्वाधिक चार विकेट्स घेतल्या. यश दयाल आणि जोश हेझलवूड यांनी प्रत्येकी दोन, तर भुवनेश्वर कुमारने एक विकेट घेतली. सुयश शर्माला विकेट मिळाली नसली तरी त्याने चांगली गोलंदाजी केली.

तत्पूर्वी आरसीबीकडून विराट कोहलीने ४२ चेंडूत आठ चौकार आणि दोन षटकारांसह ६७ धावा केल्या. देवदत्त पडिक्कलने २२ चेंडूत दोन चौकार आणि तीन षटकारांसह ३७ धावांची खेळी केली, तर सामनावीर ठरलेल्या रजत पाटीदारने ३२ चेंडूत वादळी फटकेबाजी करत पाच चौकार आणि चार षटकारांच्या मदतीने ६४ धावा केल्या. यानंतर धावसंख्या २२१वर नेण्याचे पुढचे काम जितेश शर्माने केले. १९ चेंडूत दोन चौकार आणि चार षटकारांसह त्याने ४० धावा चोपल्या. यादरम्यान त्याने बुमराहच्या अखेरच्या षटकात षटकारही लगावला. मुंबईकडून बोल्ट आणि हार्दिकने प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या, तर विघ्नेश पुथूरने एक विकेट घेतली.

### विराटने घडवला इतिहास

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा स्टार खेळाडू विराट कोहलीने मुंबई इंडियन्सविरुद्धच्या सामन्यात उत्कृष्ट फलंदाजी करीत टी-२० क्रिकेटमध्ये एक असा विक्रम केला आहे, जो आजवर कोणत्याच भारतीय फलंदाजाला जमलेला नाही. सलामीला आलेल्या विराटने दणक्यात सुरुवात करत अवघ्या २९ चेंडूत अर्धशतक झळकावले. यासह विराटने क्रिकेटच्या झटपट प्रकारात १३ हजार धावा पूर्ण केल्या. ३६ वर्षीय विराटने आपल्या डावात १७ धावा करीत ही कामगिरी केली. तो टी-२०मध्ये १३ हजार धावा करणारा पहिला भारतीय आणि हा पराक्रम करणारा जगातील फक्त पाचवा फलंदाज आहे, तर सर्वात जलद १३ हजार धावा करणारा तो जगातील दुसरा फलंदाज आहे.

# सुधागड कबड्डी प्रीमिअर लीग रंगली

## एसआरबीएस इंटरनॅशनल संघाने मैत्री चषक जिंकला

**पाली : प्रतिनिधी**

मैत्री ग्रुपच्या वतीने व सुधागड तालुका स्पोर्ट्सच्या मान्यतेने नुकतेच पाली येथील क्रीडासंकुलात सुधागड कबड्डी प्रीमिअर लीग २०२५चे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत एसआरबीएस इंटरनॅशनल संघाने बाजी मारत मैत्री चषकावर आपले नाव कोरले.

स्पर्धेत श्री साई रायडर्स, सह्याद्री वॉरियर्स, पालांडे टायगर्स, कल्पना लक्ष्मी कन्ट्रक्शन, रॉयल रायडर्स, आयुष वॉरियर्स, एसआरबीएस इंटरनॅशनल, दिघे वॉरियर्स अशा आठ संघांचा समावेश होता. लीगसाठी विविध क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी, खेळाडू, क्रीडा रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्पर्धेत कल्पना लक्ष्मी कन्ट्रक्शन संघ उपविजेता ठरला. तृतीय क्रमांक श्री साई रायडर्स आणि चतुर्थ क्रमांक रॉयल रायडर्स संघाने मिळवला.

स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू राहुल भोईर, उत्कृष्ट चढाईपटू विशाल म्हसके, उत्कृष्ट पकडपटू राज ठाकूर, पब्लिक हीरो म्हणून भाई साजेकर याची निवड करण्यात आली. विजेते संघ आणि विशेष कामगिरी बजावणाऱ्या खेळाडूंना पारितोषिकाने गौरविण्यात आले.



# लखनऊचा कोलकातावर थरारक विजय

**मुंबई : प्रतिनिधी**

लखनऊ सुपर जायंट्स संघाने उत्कृष्ट कामगिरीसह केकेआर संघावर चार धावांनी थरारक विजय मिळवला. ईडन गार्डन्सच्या मैदानावर लखनऊने प्रथम फलंदाजी करत २३९ धावांचा मोठा डोंगर उभारला होता. लखनऊकडून मिचेल मार्श आणि निकोलस पुरन यांनी वादळी फलंदाजी करत संघाला मोठी धावसंख्या उभारून दिली, पण प्रत्युत्तरात केकेआरने घरच्या मैदानावर चांगली सुरूवात केली. तरीही सुपर जायंट्सच्या संघाने अखेरच्या षटकांमध्ये भेदक गोलंदाजी करत केकेआरच्या धावांवर आळा घातला आणि अखेरीस विजय नोंदवला.

लखनऊचा संघ या विजयासह गुणतालिकेत चौथ्या स्थानी पोहोचला आहे. अखेरच्या षटकात केकेआरला विजयासाठी २४ धावांची गरज होती. रवी बिश्नोईकडे गोलंदाजीची संधी होती. हर्षित राणाने पहिल्याच चेंडूवर चौकार लगावला, तर दुसरा चेंडू डॉट बॉल गेला. यानंतर तिसऱ्या चेंडूवर हर्षितने एक धाव घेत रिंकूला स्ट्राईक दिली. आता केकेआरला विजयासाठी १९ धावांची गरज होती. रिंकूने पुढच्या दोन चेंडूवर दोन चौकार, तर अखेरच्या चेंडूवर षटकार लगावला, मात्र तो संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही.

# रायगड कबड्डी लीगमध्ये आवास वायपर्सची हॅट्ट्रिक

## भाजप प्रदेश कार्याध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांची स्पर्धेला सदिच्छा भेट





**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या रायगड कबड्डी लीग स्पर्धेत आवास वायपर्सने सलग तीन सामने जिंकून विजयाची हॅट्ट्रिक केली. दरम्यान, भाजपचे प्रदेश कार्याध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांनी स्पर्धेला सदिच्छा भेट दिली. त्यांचे रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या कार्यवाह चित्रा पाटील यांनी स्वागत केले. या वेळी आमदार महेंद्र दळवी, माजी आमदार सुभाष पाटील, रायगड कबड्डी लीगचे अध्यक्ष आस्वाद पाटील आदी उपस्थित होते.

आवास वायपर्स संघाने आपल्या पहिल्या सामन्यात ओ.पी. ईगल्स संघावर ३१-२२ अशी मात केली. दुसऱ्या सामन्यात एस.बी. फायटर्स संघाचा ४४-१५ असा सहज पराभव केला, तर तिसऱ्या सामन्यात ए.बी. सुपरप्लेयर्स संघाचा अत्यंत चुरशीच्या सामन्यात २६-२५ असा पराभव केला.

स्पर्धेत पहिल्या दिवशी काही सामने चुरशीचे झाले. पेण वॉरियर्स आणि ए.बी. सुपरप्लेयर्स हा सामना अटीतटीचा झाला. यात पेण वॉरियर्सने २८-२६ बाजी मारली. त्यानंतर झालेल्या साखळी सामन्यात त्यांनी समीरा छावा संघाचे आव्हान ३७-२३ असे परतवले.

स्पर्धेत विजयी सलामी देणाऱ्या एम.डी. वॉरियर्स संघाला दुसऱ्या साखळी सामन्यात पराभव पत्करावा लागला. समीरा छावा संघाने त्यांचा चुरशीच्या सामन्यात ३०-२९ असा पराभव केला.

दुसऱ्या दिवशी झालेल्या पहिल्या साखळी सामन्यात व्ही.जी. टायगर्स संघाने ओ.पी. ईगल्सचा ४४-३२ असा पराभव केला. पहिल्या दिवशी सलग दोन सामने जिंकणाऱ्या पेण वॉरियर्सला तिसऱ्या सामन्यात एम.डी. वॉरियर्स संघाने ३३-२७ असे नमविले.

# रोह्यात स्पेशल स्कूल्सची क्रिकेट स्पर्धा उत्साहात



**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील किल्ला येथील ग्रेगोरियन स्पेशल स्कूलने नुकतेच ऑल महाराष्ट्र स्पेशल स्कूलच्या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन ग्रेगोरियन पब्लिक स्कूलच्या मैदानावर केले होते. या स्पर्धेत विविध संघांनी सहभाग घेतला होता.

डॉ. एपीजे अब्दुल कलाम एमडीसी होम मानखुर्द विशेष शाळांमध्ये विजेते ठरले, तर आय डे केअर, पेणने उपविजेतेपद पटकावले. ग्रेगोरियन पब्लिक स्कूल संघांमध्ये ब्लू हाऊस विजेता आणि रेड हाऊस उपविजेता ठरला.

वैयक्तिक कामगिरीमध्ये सर्वोत्तम सहभागी चेतन (आय डे केअर पेण), सर्वोत्तम फलंदाज राज (शिशु कल्याण केंद्र), सर्वोत्तम गोलंदाज रुमन (मुंबई उपनगरीय संघ), अष्टपैलू सोनू (एमडीसी होम मानखुर्द), मालिकेतील खेळाडू रुद्र बाखाडे (ब्लू हाऊस-ग्रेगोरियन पब्लिक स्कूल) यांनी पुरस्कार पटकावला आहे.

बक्षीस समारंभाला वरिष्ठ पोलीस निरीक्षक मारुती पाटील, रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष शशी छाछिया, ओरोसॉफ्ट सोल्युशन्स प्रा. लि.चे सीईओ मॅथ्यू डॅनियल, रोहा डायकेमचे व्यवस्थापक शिवाजी शेलर, एक्सेल इंडस्ट्रीजचे जनरल मॅनेजर डॉ. कृष्णेंदु सिल, फादर ग्रेगोरियन कम्युनिटीचे सचिव जेकब, जनसंपर्क प्रभारी सिबिन जेकब, क्रीडा संयोजक ओपीके जोशुआ, व्ही.रेव्ह. गिवर्गीस रामबन, ग्रेगोरियन कम्युनिटीचे सदस्य फादर पॉल मॅथ्यू, ग्रेगोरियन पब्लिक स्कूल प्राचार्य फादर बेजॉय जॉर्ज, ग्रेगोरियन स्पेशल स्कूलच्या मुख्याध्यापिका कविता राजेश साळुंके, सुधीर जंगम, सोमा सिल, अश्विनी गायकवाड आदी उपस्थित होते.

# तिरंगी मालिकेसाठी भारताचा संघ जाहीर


**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

डब्ल्यूपीएलनंतर टीम इंडियाचा महिला क्रिकेट संघ आंतरराष्ट्रीय मालिका खेळण्यास सज्ज झाला आहे. बीसीसीआय महिला निवड समितीने मंगळवारी (दि. ८) या मालिकेसाठी टीम इंडियाच्या १५ सदस्यीय संघाची घोषणा केली. संघाचे नेतृत्व पुन्हा हरमनप्रीत कौरकडे सोपवण्यात आले असून स्मृती मानधनाकडे उपकर्णधारपदाची जबाबदारी असेल.

या महिन्याच्या २७ तारखेपासून भारतीय संघ एकदिवसीय तिरंगी मालिका खेळण्यास मैदानात उतरेल. ही मालिका श्रीलंकेत खेळवली जाणार असून यात द. आफ्रिका संघदेखील सहभागी होत आहे.

तिरंगी मालिका २७ एप्रिलपासून सुरू होईल आणि ११ मेपर्यंत चालेल. सर्व सामने सामने कोलंबो येथील आर. प्रेमदासा आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियममध्ये खेळवले जातील. उद्घाटनाचा सामना भारत आणि श्रीलंका यांच्यात रंगणार आहे.

या मालिकेतून हरमनप्रीत आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पुनरागमन करत आहे. या आधी जानेवारीमध्ये आयर्लंडविरुद्धच्या घरच्या एकदिवसीय मालिकेत तिला दुखापतीच्या कारणास्तव विश्रांती देण्यात आली होती. पण आता ती पूर्णपणे तंदुरुस्त आहे आणि संघाचे नेतृत्व करण्यास सज्ज आहे.


ज्ञानराज माझी योग्यांची माऊली।। जेणे निगमवल्ली प्रगट केली।।




विठ्ठल रुख्मीणी तुम्ही अखंड आणा ध्यानी।।

**वर्ष २० वे**

**वाचावी ज्ञानेश्वरी । डोळा पहावी पंढरी ।। ज्ञान होय अज्ञानासी। ऐसा वर त्या टीकेसी ।। ज्ञान होय मूढा । अती मूर्ख त्या दगडा ।। वाचील जो कोणी । जनी त्यासी लोटांगणी।।**



सर्व मंगल मांगल्ये। शिवेसर्वार्थ साधिके शरण्ये त्र्यंबकेगौरी। नारायणी नमोस्तुते।।



तुकाराम तुकाराम नाम घेता कापे यम।।

**श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत**
**माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण-कोपर आयोजित**

# अखंड हरिनाम सप्ताह

## ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

**ठिकाण - श्री शांतादेवी मंदीर, गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड**

**सर्व भाविकांना कळविण्यात आनंद होत आहे की, सालाबादप्रमाणे माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण तर्फे स्वा.सु. ह.भ.प. वै. सदानंद गुरुजी (देवाची आळंदी) यांचे परमशिष्य ह.भ.प. शिवाजी महाराज पाटणकर (देवाची आळंदी) यांच्या प्रेरणेने ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा चैत्र शुद्ध १३, गुरुवार दि. १०/०४/२०२५ ते चैत्र कृ. ४ गुरुवार दि. १७/०४/२०२५ रोजी संपन्न होत आहे. तरी कृपया सर्व भाविकांनी ह्या पर्वणीचा लाभ घ्यावा, ही नम्र विनंती.**

**देवीचा अभिषेक सकाळी ८.०० वा.**

**दैनंदिन कार्यक्रम**

**व्यासपीठ चालक : ह.भ.प. शिवाजी महाराज पाटणकर (आळंदी-देवाची)**

**पहाटे ४.०० ते ६.०० वा. - काकडा**
**सकाळी ८.३० ते १२.३० वा. - ज्ञानेश्वरी पारायण**
**सायं. ४.०० ते ५.०० वा. - प्रवचन**
**सायं. ६.०० ते ७.०० वा. - सामुदायिक हरिपाठ**
**रात्री ०८.०० ते १०.०० वा. - कीर्तन**
**किर्तनसाथ : पनवेल-उरण वारकरी सांप्रदाय**

| वार/दिनांक | प्रवचन (सायं. ४ ते ५) | कीर्तन (रात्री ८ ते १०) |
|---|---|---|
| **गुरुवार** (दि. १०/०४/२०२५) | ह.भ.प. दिपक महाराज (कुंडेगाव) | ह.भ.प. नरहरी महाराज सांगळे (जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था, देवाची आळंदी) सौजन्य : श्री. सुधीर तुलशिदास ठाकूर (खारकोपर) |
| **शुक्रवार** (दि. ११/०४/२०२५) | ह.भ.प. रोशन महाराज (बेलपाडा) | श्री श्री १००८ महामंडलेश्वर रामकृष्णानंद सरस्वती महाराज (वहाळ) |
| **शनिवार** (दि. १२/०४/२०२५) | ह.भ.प. गोपिनाथ महाराज (जासई) | ह.भ.प. बाळकृष्ण महाराज गोगावले (सासेवाडी, ता. भोर, जि. पुणे) कै. गिताबाई त्रिंबक देशमुख यांच्या स्मरणार्थ सौजन्य- श्री. विराज जयवंत देशमुख (गव्हाण) |
| **रविवार** (दि. १३/०४/२०२५) | ह.भ.प. राजेंद्र महाराज गुरुजी (कुंडेगाव) | भाषाप्रभू ह.भ.प. रमेश महाराज भोर पाटील (अकोले) कै. सविता शिवाजी देशमुख यांच्या स्मरणार्थ सौजन्य -श्री. किरण शिवाजी देशमुख (गव्हाण) |
| **सोमवार** (दि. १४/०४/२०२५) | ह.भ.प. कृष्णा महाराज ठाकूर (धुतुम) | ह.भ.प. श्री. भगिरथ महाराज काळे (सिन्नर) कै. शिवाजी रघुनाथ देशमुख यांच्या स्मरणार्थ सौजन्य - श्री. किरण शिवाजी देशमुख (गव्हाण) |
| **मंगळवार** (दि. १५/०४/२०२५) | ह.भ.प. धावजी बाबा महाराज (जासई) | ह.भ.प. विक्रांत महाराज पोंडेकर (जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था, देवाची आळंदी) कै. शिवाजी गजानन पाटील यांच्या स्मरणार्थ सौजन्य : सौ. ललिता सुनील पाटील (खारकोपर) |
| **बुधवार** (दि. १६/०४/२०२५) | सकाळी ८.३० वा. - ग्रंथराज ज्ञानेशरी पुजन सायं.४ ते ५ वा. - दिंडी सोहळा व दिपोत्सव सोहळा | ह.भ.प. गाथामूर्ती देवेंद्र महाराज निढाळकर (आळंदी देवाची) सौजन्य : सौ. श्रद्धा रमेशशेठ ठाकूर (खारकोपर) |

**काल्याचे कीर्तन, गुरुवार, दि. १७/०४/२०२५ रोजी सकाळी १० ते १२ वा. भाषाप्रभू ह.भ.प. जगन्नाथ महाराज (आसनगाव)**
**सौजन्य : श्री. महेंद्रशेठ तुकाराम घरत (शेलघर)**


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com